# जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ८.११.२०१७
## कार्यवृत भाग -१

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०८.११.२०१७ वेळ दुपारी १.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पट ाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद गोंदियाची सर्वसाधारण सभा दिनांक ०८.११.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हा परिषद सभागृहात श्रीमती उषाताई मेंढे मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली. सभेला हजेरी पटाप्रमाणे मा. उपाध्यक्ष, सन्मा. सभापती, जिल्हा परिषदेचे सन्मा. सदस्य, पंचायत समितीचे सन्मा.सभापती, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभेचे सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद व इतर विभागाचे खाते प्रमुख, गटविकास अधिकारी, उपअभियंते व इतर कर्मचारीवृंद उपस्थित होते, सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदया यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करण्याची घोषणा केली.

**विषय क्रं. १ - मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करणे.**

मागील सभेच्या कार्यवृत्तावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सभागृहाचे असे निदर्शनास आणुन दिले की, मागील वर्षी आजच्या तारखेला दिनांक ०८.११.२०१६ ला मा.पंतप्रधान श्री.नरेन्द्र मोदी यांनी संपूर्ण देशात नोटबंदी केली त्यामुळे भारत देशातील बरेच व्यक्ती मृत्यमुखी पडली होती. मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींकरीता सभागृहात दोन मिनीट मौन धारण करुन श्रध्दांजली देण्याची विनंती केली. सन्मा.जि.प.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले. सन्मा.सभापती श्री.पी.जी.कटरे यांनीही प्रस्तावाचे समर्थन केले. मा.सभाध्यक्ष महोदया यांनी आजचा दिवस काळा दिवस म्हणून पाळून दोन मिनिटे सर्वानी उभे राहून मौन धारण करुन श्रध्दाजंली द्यावी अशी सुचना केली. सभागृहात उपस्थित सर्वानी मौन धारण करुन श्रध्दांजली देण्यात आली.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी अनुपालन मधील पान क्र.२ वरील मुद्या क्र. ३ च्या बाबतीत MSEB ने सविस्तर माहिती देण्याची मागणी केली. यावर कार्यकारी अभियंता MSEB यांनी ज्या शाळेच्या आवारातून किंवा शाळेच्या इमारतीवरुन विद्यूत तार गेली आहे अशा शाळांची माहिती प्राप्त झालेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता संबधित उपविभागीय अभियंता यांना निर्देश देण्यात आले आहेत तसेच सदर काम करण्याकरीता निधीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी सदर कामाकरीता किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती मागीतली. यावर कार्यकारी अभियंता MSEB यांनी अंदाजे १५ ते २० दिवसात अंदाजपत्रक तयार होतील व त्यानुसार किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती मी देवू

शकतो असे अवगत केले. सन्मा.सदस्य श्री. रमेश अंबुले यांनी जिल्हा नियोजन समिती कडे निधी उपलब्ध आहे किंवा नाही अशी विचारणा केली. सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी त्यांचे जि.प. क्षेत्रातील खैरबोडी, काचेवाणीटोला या शाळेचे नांव समाविष्ठ करण्याची मागणी केली. कार्यकारी अभियंता MSEB यांनी काही कामे तातडीची व अति आवश्यक असल्यास त्या प्रकरणी विभागाकडून उपाययोजना करता येईल असे सभेस आश्वासित केले.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी मागील सर्वसाधारण सभेच्या नंतर जिल्हा नियोजन समितीची सभा झालेली नाही त्यामुळे वरील प्रकरणी नियोजन समितीच्या सभेत चर्चा झाली नसल्याचे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री .सुरेश हर्षे यांनी मागील सभेत ठरल्याप्रमाणे याबाबत मा. सभाध्यक्ष महोदया यांनी सदर प्रकरणी मा. पालकमंत्री महोदय, मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन मार्ग काढणार होतात, परंतू अद्याप प्रश्न मार्गी का लागला नाही अशी विचारणा केली. यावर मा. सभापती श्री.पी.जी.कटरे यांनी सभेस अवगत केले की, उपस्थित जि.प.सदस्यापैकी बरेच सदस्य हे जिल्हानियोजन समितीचे सदस्य आहेत म्हणून जिल्हानियोजन समितीच्या सभेत सदर विषयावर चर्चा घडवून आणून निधीची मागणी करता येईल असे मत व्यक्त केले.

सन्मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सभेस कार्यकारी अभियंता MSEB यांनी जी कामे तातडीची आहेत ती कामे आधी करण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्य श्री. किशोर तरोणे यांनी अनुपालन अहवालातील अनुक्रमांक १० वर जि.प.शाळेच्या किती खोल्या व किती ईमारती धोकादायक आहेत याची माहिती मागीतली. यावर शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी सभेस आकडेवारीच्या स्वरुपात माहिती दिली व SSA मार्फत १३९५ वर्ग खोल्याची दुरुस्ती व DPC अंतर्गत २५६ वर्ग खोल्याची दुरुस्ती करण्यात आली असल्याचे सांगीतले.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी जिल्हयात लाल कवेलूच्या किती शाळा आहेत याची माहिती मागीतली. तसेच मौजा खोडशिवणी शाळेची इमारत ही लाल कवेलूची असुन सदर ईमारत ई.सन १९६२ ची आहे. सद्यस्थितीत लालकवेलू उत्पादन बंद झालेले आहे, त्यामुळे खोडशिवणी येथील शाळेकरीता नविन वर्ग खोलीची मागणी केली. मौजा गिरोला येथील कामास प्राधान्य देण्याचीही मागणी केली.

सन्मा.सदस्य सुरेश हर्षे यांनी आमगांव तालुका अंतर्गत शाळेच्या इमारतीवर विज पडल्यामुळे इमारतीला भेगा पडलेल्या आहेत तिथे शाळेच्या दुरुस्तीकरीता निधीची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री. रमेश चुऱ्हे यांनी सौंदड येथील शाळेचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे आढळून आल्यास संबंधित कंत्राटदारावर कोणती कार्यवाही होणार अशी विचारणा केली. शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी सदर बाबतीत कार्यकारी अभियंता सा.बा. जि.प. हे माहीती देतील असे सभेस अवगत केले.

कार्यकारी अभियंता सा.बा. जि.प. यांनी सभेत सर्वप्रथम आपला परिचय दिला व ज्या शाळेवर स्लॅब टाकलेले असुन जर त्या स्लॅब मधून पावसाळयात पाणी गळत असेल तर त्यावर उपाययोजना करता येईल असे अवगत केले.

सन्मा. सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करणाऱ्या एखादया कंत्राटदाराला काळया यादीत टाकले आहे काय? व्यक्ती स्वत:चे घर बनवितो तर गळत नाही शासकिय कार्यालय बनवितो तर तो का गळतो अशा प्रश्न केला. यावर सन्मा.सभापती श्री.पी.जी.कटरे यांनी कंत्राटदाराला सेक्युरिटी १ वर्षे पर्यंत अदा करु नये तसेच स्लॅब टाकते वेळी संबधित अभियंता यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्य श्री. हमीद अल्ताफ यांनी सभागृहाचे असे निदर्शनास आणून दिले की, घरकुलाच्या इमारतीचे स्लॅब मधून पाणी गळत नाही पण सौंदड येथील शाळेच्या बांधकामाच्या स्लॅब मधून पाणी गळते त्या ठिकाणी ८ mm चे लोखंडी रॉड वापरलेले आहे. यास जवाबदार अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्याची मागणी केली व शासकिय निधीचा अपव्यय झाला असल्याचे मत केले.

सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी शासकिय इमारतीवर स्लॅब टाकत असतांना संबधित अभियंता यांनी कसा लोखंड बांधला आहे हे पाहावयास पाहिजे तसेच स्लॅब टाकतांना अभियंता यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे तसेच सेंन्ट्रीग बरोबर आहे काय? वाकली तर नाही याची पाहणी करणे आवश्यक असल्याचे सभागृहास अवगत केले.

सन्मा.सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी कनिष्ठ अभियंता स्लॅबचे वेळेस उपस्थित राहत नाहीत, कनिष्ठ अभियंता यांचे सहायक जातात माझे मतदार संघात अशी घटना घडलेली असल्याचे सभेस असे अवगत केले.

सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी NRHM व SSA च्या माध्यमातून जी कामे करण्यात येतात त्या कामापेक्षा जि.प.च्या बांधकाम विभागामार्फत होत असलेली कामे ही व्यवस्थित राहत नाहीत असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सन्मा.जि.प.सदस्यांनी जी बांधकामे निकृष्ठ दर्जाची असल्याची तक्रार केली आहे अशा बांधकामाची चौकशी कार्यकारी अभियंता(सा.बा.) यांनी करावी व वस्तुस्थिती अहवाल पुढील सभेत ठेवण्याचे निर्देश दिले.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी दिनांक ०७/११/१७ च्या स्थायी समिती सभेत ज्याप्रमाणे गोंदिया जिल्हा दुष्काळाबाबत ठराव घेण्यात आलेला होता तसाच ठराव आजच्या सभेत घेवून जि.प.कृषि विभाग व राज्य कृषि विभाग यांचे संयुक्त स्वाक्षरीने कृषि संचालक पुणे यांना पाठविण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री. मनोज डोंगरे यांनी तिरोडा तालुक्यामध्ये मध्यम दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे. त्यांनी शासनाच्या या आदेशाचा निषेध केला तसेच पिण्याच्या पाण्याबाबत टंचाई निर्माण होत असल्याची माहिती देत उपाययोजना करण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी गोंदिया जिल्हयात काही भागात जमिनीत ओलावा असुन काही शेतकरी कडधान्य लावण्याच्या तयारीत आहेत त्याकरीता जि.प. गोंदियाच्या कृषि विभागातर्फे शेतकऱ्यांना वाण पुरविण्याबाबत काही उपाययोजना केलेली आहे काय? अशी विचारणा केली.

सन्मा. सदस्य श्री. रमेश अंबुले यांनी सभागृहाचे असे निदर्शनास आणून दिले की, यावर्षी शेतकऱ्यांनी शेतात लावलेल्या धानावर मावा व तुडतुडा या प्रकारचे बऱ्याच प्रमाणात रोगांची लागण झालेली आहे. शेतात औषधाची फवारणी करुन सुध्दा नियत्रंण करता आले नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या वतिने मार्गदर्शन केलेले नाही. जि.प. ने याबाबत कोणती कार्यवाही केली याची विचारणा केली.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. इंगळे यांनी मी स्वत: मौजा गोंगले, पाटेकुर्रा व मुरदोली या क्षेत्रात धानाच्या शेतीची पाहणी केलेली आहे असे सभागृहास अवगत केले. शेतकऱ्यांच्या माहीतीकरिता उद्‌भवणाऱ्या रोगांच्या बाबतीत वर्तमान पत्रातुन औषधी बाबत व उपाययोजने बाबत बातमी प्रकाशीत करण्यात आली असल्याची माहीती दिली.

सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी कृषि विभागाचे तालुकास्तरावरील व गावपातळीवरील कर्मचारी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत नाही ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

सन्मा.सदस्य श्री. मनोज डोंगरे यांनी सुध्दा कृषि विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत नाही तसेच प्रत्येक शेतकऱ्यांकडे वर्तमानपत्र येत नसल्यामुळे त्यांना याची जाणीव राहत नाही ही बाब निदर्शनास आणून दिली.

सन्मा.सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी जि.प.कृषि विभागाने बियाणे वाटपाचे काय नियोजन केले आहे अशी विचारणा केली. यात सन्मा.सदस्य श्री. किशोर तरोणे, श्री.सुरेश हर्षे यांनी चर्चेत भाग घेतला.

सन्मा.उपाध्यक्ष महोदया यांनी उमेद, कृषि सहाय्यक, कृषि सखी, कृषि मित्र हे तिन घटका मार्फत गाव स्तरावर काम करतात. त्यांनी कोण कोणती कामे केली, त्यांची नांवे व फोन क्रमांक याची गाव निहाय व तालुका निहाय माहिती देण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री. रमेश चुऱ्हे यांनी कृषि विभागाने टोल फ्री क्रमांक काढला आहे काय? अशी विचारणा करीत यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या मार्गी लागु शकतात असे सुचविले. यास सन्मा.सदस्य श्री.कैलाश पटले यांनीही दुजोरा दिला.

जिल्हा कृषि विकास अधिकारी कु. वंदना शिंदे यांनी कृषि समिती सभेत रु. ३ लक्षची तरतूद मंजुर करण्यात आली आहे. तालुका निहाय वाटप करण्याची यादी मागविण्यात आली आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी माझे जि.प.क्षेत्रात कृषि मित्र, कृषि सखीची नियुक्ती केलेली नाही शेतकऱ्यां करीता प्रशिक्षणाची मागणी केली.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची सुचना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना केली.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी शासनाच्या योजनांची माहिती सभेस अवगत केली तसेच सर्व शासनाच्या योजना हया DBT झाल्या आहेत. शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्याकरीता अर्ज करावे अशी माहिती दिली.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी कृषि विभागाच्या जि.प. व राज्याच्या ज्या योजना शेतकऱ्यांकरीता आहेत त्याबाबत सन्मा.जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सरपंच, ग्रा.पं.सदस्य व सचिव यांना अद्यावत माहिती द्यावी तसेच गावस्तरावर, तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करताना सन्मा.सदस्यांना विश्वासात घ्यावे असे निर्देशीत केले.

सन्मा.सभापती पंचायत समिती सालेकसा श्री. फाफनवाडे यांनी हरभऱ्याची बिजाई आली होती काय? वाटप केले काय अशी विचारणा केली.

सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी हरभऱ्याची बिजाई आली होती. यांना DBT लागु नसल्याचे सांगीतले.

सन्मा. उपाध्यक्ष महोदया यांनी बियाणे कशी आली आहे व कशा प्रकारे वाटप करण्यात येत आहे याची विचारणा केली.

सन्मा.सदस्या श्रीमती रजनी सोयाम यांनी जि.प. च्या कृषि विभागाने बियाणे वाटपाबाबत काय उपाययोजना केली आहे? बियाणे वाटपाची पध्दत काय? शेतकऱ्यांना वेळीच कडधान्याची बियाणे मिळतील काय? याची विचारणा केली. या विषयालाच अनुसरुन सन्मा.सदस्य श्री. सुखरामभाऊ फुंडे व श्री. विश्वजित डोंगरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात धानाची शेती लावावी किंवा नाही याबाबत शासनाच्या काही सुचना आहेत काय? अशी विचारणा केली.

सन्मा.सदस्य श्री. विठोबा लिल्हारे यांनी माझे जि.प.क्षेत्रातील ११ शेतकऱ्यांचे शेतातील विद्युत कनेक्शन विद्युत विभागाने कापलेले आहेत. याला कोणती कारणे आहेत. याची माहिती मागीतली.

मा.उपाध्यक्ष महोदया यांनी सन्मा.सदस्य श्री. रमेश अंबुले यांनी केलेल्या प्रश्नाबाबत शेतकऱ्यांनी उन्हाळयात धानाचे पिक लावू नये अशा सुचना शेतकऱ्यांना द्यावे असे सुचित केले.

सन्मा.सदस्य श्रीमती रजनी सोयाम यांनी मौजा लोणारा व नांदुरपारा येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे त्यामुळे २ बोअरवेल करण्याची मागणी केली. शेतातील बोअरवेल मुळे गावातील बोअरवेल व विहिरीत पाणी राहत नाही. असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

सन्मा.सभापती श्री. पी. जी. कटरे यांनी शेतकऱ्यांचे विंधन विहिरीचे कनेक्सन कापण्यांत येवू नये याची दखल MSEB विभागाने द्यावी अशी सुचना केली.

यावर कार्यकारी अभियंता MSEB यांनी शासनाची कृषि संजिवनी योजना सुरु आहे थकित विद्युत असलेल्या शेतकऱ्यांनी १५ नोव्हेंबर पर्यंत देयके भरावयाची आहेत व पुढील १२ महिण्याकरीता देयकाचे हप्ते करण्यात आले आहेत व त्यानुसार नविन देयके वाटपाची कार्यवाही सुरु असल्याचे सांगीतले.

सन्मा.सभापती श्री.पी.जी.कटरे यांनी शेतकऱ्यांना सरसकट विद्युत पंपाचे देयके देण्यात येतात व मिटरची रिडींगही घेत नाहीत. बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मिटर फॉल्टी आहेत ते अद्याप बदलविण्यात आले नाही त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. कृषि संजिवनी योजनेची मुदत ३० डिसेंबर २०१७ पर्यंत करण्याचा ठराव करुन शासनाला पाठविण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी सभागृहाचे निदर्शनास आणून दिले की, दिनांक १०/०८/१७ च्या जि.प.सर्वसाधारण सभेत अति. विषय क्र.३/४ नुसार शेतकऱ्यांना ५०% अनुदानावर ताडपत्रीचे वाटप करणे बाबत खरेदी व खर्चास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे परंतू अद्याप पर्यंत खरेदी करुन वाटप करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. या प्रक्रियेस विलंब का व कशामुळे झाला याची माहिती मागीतली.

जिल्हा कृषि अधिकारी जि.प. कु .वंदना शिंदे यांनी आचार संहिता असल्यामुळे विलंब झालेला आहे वाटपाची कार्यवाही सुरु आहे नस्ती मंजुर झाली असुन पंचायत समिती स्तरावर वाटप कार्यवाही सुरु आहे. चर्चेत भाग घेतांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आचार संहिता असल्यामुळे विलंब झाल्याचे सांगीतले.

सन्मा.सभापती श्री. शिवणकर पं.स. अर्जुनी मोरगांव यांनी दोन वर्षाची एकत्र निधीला खर्च करण्याची परवानगी दिली आहे. सदर निधी १२ महिण्याचा कालावधी झाला असुन अद्याप खर्च झाला नाही आचार संहिता होती काय? अशा प्रश्न उपस्थित केला.

सन्मा.सभापती श्री. पी. जी. कटरे यांनी वस्तुस्थिती दर्शविणारी माहिती द्यावी. खोटी माहिती देण्यात येवू नये. सदर विषयाची अवतरण प्रत त्वरीत घेवून कार्यवाही पुर्ण करु शकले असते. तसेच याबाबत खंडविकास अधिकारी यांनी पत्र न मिळाल्याचे सभेस अवगत केले.

सन्मा.सदस्य श्री. कैलाश पटले यांनी PHC इंदोरा बु. येथील वैद्यकिय अधिकारी (डॉ.मुरारी सिंग) हे नागपूर येथे काम करतात व पगार PHC इंदोरा बु. मधून निघत आहे. त्यांना परत

बोलविण्यात यावे. राजीव गांधी योजने अंतर्गत नियुक्ती झालेली असुन याचा फायदा ग्रामीण जनतेला होत नाही. असे सभागृहाच्या निर्देशनास आणुन दिले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. श्री. निमगडे यांनी सदर विषयाबाबत अवगत केले की, मा. उपसंचालक यांचे आदेश असल्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. परंतू डॉक्टरची कमतरता असल्यामुळे त्यांना परत बोलाविण्याबाबत पत्र व्यवहार केलेला आहे.

सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी सभागृहाची भावना त्यांचे वरिष्ठांना कळविण्यात यावे व त्यांची बदली करुन नविन वैद्यकिय अधिकारी देण्यात यावा अशा आशयाचे पत्र व्यवहार करण्याचे सुचित केले. यास सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी समर्थन दिले.

सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी अति. विषय क्र.३/१० मध्ये प्रा.आ.केंन्द्र इंदोरा व करटी बु.चा मुद्या उपस्थित करुन सभागृहात माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती शैलजा सोनवाने यांनी गोंदिया तालुका अंतर्गत उपकेंद्र मंजुर करण्याच्या प्रस्तावाची मंजुरीची काय कार्यवाही झाली याची माहिती मागीतली.

सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी जि. प. च्या PHC अंतर्गत लॅब टेक्नीशिअयन ची पदे रिक्त असुन सदर रिक्त पदे भरण्याची मागणी केली. यावर मा.सभापती श्री. पी. जी. कटरे यांनी केंद्र शासनाने पदे नामंजुर केली परंतू भरती न केल्यामुळे पदे रिक्त असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सदर रिक्त पदे भरण्याकरीता ठराव करुन शासनास पाठविण्याबाबत सुचित केले.

सन्मा.सदस्या श्रीमती शिला चव्हाण यांनी PHC पांढरी येथील रिक्त पदे भरण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती खुशबु टेंभरे यांनी उपकेंद्र कुडवा करीता कंपाऊडवालची मागणी केली तसेच सदर परिसरात स्वच्छतेचा अभाव असुन जनजागृतीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी महिर्षी सुदशन सफाई कामगार संस्थेच्या वतिने करण्यात आलेल्या साफ सफाईच्या कामाचा मोबदला सफाई कामगारांना मिळाला नसल्याचे अवगत करुन सदर प्रकरणी कार्यवाही करण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री.मनोज डोंगरे यांनी कवलेवाडा सब सेंटर मध्ये पाण्याची अडचण असुन पाण्याची व्यवस्था करण्याची तसेच मुंडीपार येथे सब सेंटर मंजुर करण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती दुर्गाबाई तिराले यांनी सालेकसा तालुका अंतर्गत मौजा मुरकूडोह दंडारी येथे आरोग्य विभागाचे सब सेंटर सुरु करण्याची मागणी केली. तसेच मौजा कहाली सब सेंटर येथे

पिण्याकरीता अशुध्द पाणी असल्यामुळे शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी केली. जमाकुडो येथील सब सेंटर करीता रुग्णांना ने- आण करण्याकरीता एक वाहनाची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती माधुरी पाथोडे यांनी मौजा चिखली येथे PHC सुरु करण्याची व मौजा खोबा येथे सब सेंटर सुरु करण्याची मागणी केली. तसेच खोडशिवनी उपकेंद्र येथे कुत्रा चावल्याची प्रतिबंधक लस उपलब्ध नसल्याचे अवगत केले. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी की, कुत्रा चावल्याची प्रतिबंधक लस सर्व PHC मध्ये उपलब्ध असल्याचे सभागृहास अवगत केले.

सन्मा.सभापती श्री.अरविंद शिवणकर पं.स.अर्जूनी मोरगांव यांनी NRHM अंतर्गत उपकेंद्राना २५% निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पंरतू नगर पंचायत क्षेत्रात येत असलेल्या जि.प.सदस्यांना उपकेंद्र बळकटीकरण करण्याकरीता निधी का देण्यात येत नाही अशी विचारणा केली. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी याबाबत आयुक्त यांना मागदर्शन मागण्यात आले आहे. मार्गदर्शन प्राप्त झाले असुन पत्र मा. सभापती यांना देण्यात आलेले आहे सदर पत्रात नगरपरिषद क्षेत्र असल्यामुळे अनुज्ञेय नाही असे नमुद आहे.

मा. सभाध्यक्ष महोदया यांनी नगरपरिषद क्षेत्रात जि.प. मालकीच्या ज्या इमारती आहेत जसे दवाखाने, शाळा, आंगणवाडी जी जागा जि.प. च्या नावांनेच राहिल असा आजचा ठराव करुन शासनास पाठविण्याचे निर्देश संबधित अधिकारी यांना दिलेत.

सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी गोंदिया जिल्हयात बरेचसे कोचिंग क्लॉसेस चालतात याची चौकशी होणे आवश्यक आहे. सदर कोचिंग क्लॉसेस मध्ये जि.प.चे किंवा खाजगी संस्थेत काम करीत असलेले शिक्षक काम करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. यात गुणवत्ता प्राप्त शिक्षक नसतील तर त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्य श्री. रमेश अंबुले यांनी सदर कोचिंग क्लॉसेसना कोणत्याच प्रकारचे रजिस्टेशन नाही, ते कोणत्याही प्रकारचा हिशोब ठेवत नाहीत. फक्त गोंदिया येथे यश व सुमो कोचिंग क्लॉसेस मान्यता प्राप्त आहेत. तरी इतर कोचिंग क्लॉसेस बाबत चौकशी करण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री. विश्वजीत डोंगरे यांनी जि.प.च्या शाळेत किती अधिकारी व कर्मचारी यांची मुले शिक्षण घेतात याची माहीती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. तसेच जिल्हयात किती कॉन्व्हेंट व खाजगी माध्यमाच्या शाळा किती शाळा आहेत, त्यात शिकवित असलेल्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता काय आहे याबाबतची माहीती पुढील सभेत सादर करण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री. दिपक पवार यांनी सभागृहाचे निदर्शनास आणून दिले की, देवरी व अर्जूनी मोरगांव येथील शाळेत विद्यार्थी प्रवेश घेतात व गोंदिया येथील कोचिंग क्लॉसेस मध्ये शिकवणी वर्ग लावतात याची सुध्दा चौकशी करण्याची मागणी केली.

यावर सन्मा. अध्यक्ष महोदया यांनी शिक्षणाधिकारी, जि.प. यांनी यावर त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देशीत केले.

सन्मा.सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी एकच विषय ४ तास चाललेला आहे, प्रत्येकाला बोलायला वेळ देणे आवश्यक असल्याचे तसेच अध्यक्ष पदाचा अधिकाराचा वापर करण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्या श्रीमती लता दोनोडे यांनी जि.प. च्या शाळेत कार्यरत घडयाळी तासिकेवर काम करणाऱ्या शिक्षकांना वेळेवर मानधन मिळत नसल्यामुळे बरेच घडयाळी तासिका शिक्षक शाळा सोडून जात असल्यामुळे शिक्षकांची कमतरता निर्माण होत आहे व त्यामुळे विद्यार्थ्यांचे कधीही भरुन न निघणारे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती माधुरी कुंभरे यांनी ककोडी येथील घडयाळी तासीकांवर काम करणाऱ्या शिक्षकांचे मानधन मिळाले नाही असे अवगत करुन त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती लता दोनोडे यांनी PHC मध्ये वाहनाची कमतरता असल्यामुळे अधिकचे वाहन पुरविण्याची मागणी केली यावर सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी नियोजन करुन घेता येईल परंतू दोन वाहन पुरविण्यात येणार नाही असे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्या श्रीमती शैलजा सोनवाने यांनी जि.प.च्या शाळेत कॉन्व्हेटचे वर्ग सुरु करण्याची परवानगी देण्यात यावी तसेच शाळेत शालेय पोषण आहार मिळत नाही व कर्मचारी वेळेवर येत नाही असे निदर्शनास आणून दिले.

सन्मा.सदस्या श्रीमती लता दोनोडे यांनी कळोतीटोला व साखरीटोला या रोडवरील पावरहाऊस रोडच्या आजु-बाजुने झुडपी जंगल आहे या ठिकाणी दोन-तिन अपघात झालेले आहेत. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना येण्या-जाण्याकरीता फार त्रास होत आहे व मोठा धोका होण्याची शक्यता नाकारता येणार नाही असे सभागृहास अवगत करुन आजूबाजुचे झुडुपे कापण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री.जियालाल पंधरे यांनी विर महानायक बिरसामुंडा यांचे जयंती निमीत्त जि.प.च्या व खाजगी शिक्षण संस्थेच्या शाळेत दिनांक १५ नोव्हेंबर हा दिवस क्रांती दिवस म्हणून साजरा करण्याकरिता शाळेला सुट्टी जाहिर करण्याची मागणी केली यास सन्मा.सदस्या श्रीमती सिमा मडावी यांनी अनुमोदन केले. सन्मा. उपाध्यक्ष महोदया व सन्मा.सभापती श्री. पी.जी.कटरे यांनी शाळेला सुट्टी न देता शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करुन निबंधस्पर्धा तसेच विर महानायक बिरसामुंडा यांचे जिवनचरित्रावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करावे असे मत व्यक्त केले. सन्मा.सदस्य श्री. विश्वजीत डोंगरे यांनी जि.प.च्या सर्व विभागामध्ये यांचे आयोजन करावे अशी मागणी केली.

सन्मा.सदस्य श्री. रमेश चुऱ्हे यानी कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई चे शासन निर्णय क्रमांक आउयो-२४१६/प्र.क्र.१७७/४अे दिनांक ९ ऑगष्ट, २०१७ नुसार सुधारीत आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील) राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. यात नवीन विहिर, जुनी विहिर दुरुस्ती, इनवेल बोअरींग, वीज जोडणी आकार, शेततळयाचे प्लॉस्टिक अस्तरीकरण, परसबाग, सुक्ष्म सिंचन संच ईत्यादींचा लाभ देण्याकरीता निर्गमित करण्यात आलेला आहे. यात पात्रतेच्या अटी मध्ये एकुण ७ अटी आहेत त्यापैकी अट क्रमांक २ शेतकऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. परंतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई चे शासन निर्णय क्रमांक विद्ययो-२०१६/प्र.क्र.१७६/४अे दिनांक ५ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयात क्रमांक २४ मध्ये लाभार्थी पात्रतेच्या अटी मध्ये क्र.२ मध्ये शेतकऱ्यांकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे असे नमुद आहे. जात वैधतेबाबत नमुद नाही. वरील दोन्ही शासन निर्णय एकाच विभागाचे असुन यामध्ये जात वैधता प्रमाणपत्राची अट नमूद नाही. करीता ९ ऑगष्ट २०१७ मधील अट क्रमांक २ दुरुस्त करण्याकरीता ठराव घेवून शासनास पाठविण्याबाबत मुद्दा मांडला. सन्मा.सदस्या श्रीमती रजनी सोयाम यांनी अनुमोदन केले.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी कृषि विकास अधिकारी यांना याबाबत शासन निर्णय तपासुन घ्यावा. तसेच जर अनुसूचित जातीकरीता सदर योजना आहे व त्यात अट नाही तर अनुसूचित जमाती करीता अट क्रमांक २ बाबत शासनास आजच्या सभेचे संदर्भ देवून पत्रव्यवहार करावा तसेच आवश्यक वाटल्यास ठराव करुन शासनाकडे पाठपुरावा करण्याचे निर्देशित केले.

**विषय क्र.२:- शासकिय परिपत्रकाचे वाचन करणे.**

शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या परिपत्रकाची माहिती सभागृहास देण्यात आली.

**विषय क्र.३:- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्र.३/१:- जिल्हा पातळीवरील ४% सादिल खर्च करण्यास मंजूरी प्रदान करणे बाबत.**

-----शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वरील विषयाची टिप्पणी सभागृहासमोर प्रस्तुत केली, त्यावर साधकबाधक चर्चा होवून सभागृहानी मंजूरी प्रदान केली.

**विषय क्र.३/२:- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात जिल्हानिधी मध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (गावची शाळा आमची शाळा) या उपक्रमात असलेले अनुदान सन २३०१७-१८ मध्ये खर्च करण्याची मंजुरी प्रदान करणेबाबत.**

-----शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वरील विषयाची टिप्पणी सभागृहासमोर प्रस्तुत केली, त्यावर साधकबाधक चर्चा होवून सभागृहानी मंजूरी प्रदान केली.

**<u>विषय क्र.३/३:-</u> समाजकल्याण विभागाअंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील जिल्हा निधी अंतर्गत योजनांवरील शिल्लक तरतुद सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्याची मंजुरी मिळणेबाबत.**

-----समाजकल्याण अधिकारी यांनी वरील विषयाची सविस्तर टिप्पणी सभागृहासमोर प्रस्तुत केली, यावर साधक बाधक चर्चा होवून सभागृहानी मंजूरी प्रदान केली.

**<u>विषय क्र.३/४:-</u> समाजकल्याण विभागाअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील जिल्हानिधी अंतर्गत योजनांवरील तरतुदीचे नियोजनास,योजनेच्या खर्चास तथा मालमत्ता संपादनास मंजुरी मिळणे बाबत.**

-----समाजकल्याण अधिकारी यांनी वरील विषयाची सविस्तर टिप्पणी सभागृहासमोर प्रस्तुत केली, यावर साधक बाधक चर्चा होवून सभागृहानी मंजूरी प्रदान केली.

**<u>विषय क्र.३/५:-</u> सर्वश्री डी.बी.डहाट,आय.जे.शिवणकर व एल.के.शहारे पंपचालक हे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांवर कार्यरत जिल्हा परिषद मार्फत रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन व इतर देय लाभ मिळण्याबाबत.**

-----कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी सदर विषयाची सविस्तर टिप्पणी सभागृहासमोर प्रस्तुत केली, यावर साधक-बाधक चर्चा होवून सभागृहानी मंजूरी प्रदान केली.

**<u>अतिरिक्त चर्चा</u>**

१) सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी महिला व बाल कल्याण विभाग अंतर्गत श्रीमती मधु घोगे यांचे कोर्ट प्रकरणात सर्वोच्च न्यायालयीन वकिलास रु.१.०० लक्ष मानधन दिले आहे प्रकरणाची स्थिती अद्याप स्पष्ट नाही. जि. प. च्या पॅनलवर सर्वोच्च न्यायालयीन प्रकरण हातळयाकरीता वकिलांची नियुक्ती करण्यात आली आहे काय? याबाबत सविस्तर माहिती व सद्यस्थिती अहवाल चौकशीसह येणाऱ्या स्थायी सभेत व सर्वसाधारण सभेत ठेवण्याची मागणी केली. तसेच जि.प. चे सर्वच न्यायालयीन प्रकरणाची माहिती सुध्दा ठेवण्याची मागणी केली.
२) सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी तिरोडा येथे तालुका वैद्यकिय अधिकारी यांच्या कार्यालयाची जागा ही जि.प. च्या मालकीची आहे. सदर प्रकरणी कोर्ट प्रकरण सुरु होते. या प्रकरणी जि.प. च्या वतिने कोणती कार्यवाही करण्यात आली सदर जागेचे मोजमाप करण्यात आले आहे काय? सदर जागेत जि.प. ने दुकानगाळे बांधले तर जि.प. च्या उत्पन्नात वाढ होईल असे मत व्यक्त केले. यास सन्मा.सदस्य श्री. रमेश अंबुले यांनी अनुमोदीत केले.
३) सन्मा.उपाध्यक्ष महोदया यांनी जि.प. च्या गोंदिया जिल्हयातील जागेच्या मोजमाप करीता रेव्हनी डिपार्टमेंट चे सेवानिवृत्ती अधिकाऱ्यांची नियुक्ती मानधन तत्वावर करणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हानिधीतून २.०० लक्ष रुपये तरतूद करण्यात आली असल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. सन्मा.सदस्य श्री. शेखर पटले यांनी जि.प.मालकीच्या सर्वच जागा जि.प. ने ताब्यात घेणे आवश्यक आहे परंतू याबाबत जि.प. फार उदासिन दिसुन येते असे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी मानधन तत्वावर नियुक्ती करण्याकरीता वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची मागणी केली.

४)सन्मा.सदस्य श्री. अलताफ हमीद यांनी देवरीला जि.प. च्या वतिने दुकानगाळे बांधकाम करुन वाटप केलेले आहे. परंतू ज्याना दुकान गाळे वाटप केलेले आहेत त्या दुकान गाळया समोर काही व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे. त्यांना हटविण्याबाबत जि.प. ने कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली. तसेच ज्या व्यक्तिने दुकान गाळे भाडयाने घेतले आहे ते दरमहा मासिक भाडा जि.प.ला भरत आहे असे सभागृहास अवगत केले.

५)सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी आमगांव येथील दुकानगाळेचे वाटप करण्यात आले आहे परंतू ज्या व्यक्तींना दुकान गाळे वाटप करण्यात आलेले आहे त्यांना ताबा देण्यात आलेला नाही तसेच त्या दुकानगाळयासमोर काही व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे त्यामुळे त्यांना अडचण निर्माण झाली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

६)मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सदर प्रकरणी खंडविकास अधिकारी यांनी पोलीस सरंक्षणात अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत. तसेच अतिक्रमण हे रोडच्या आत असल्यास संबधित उपअभियंता यांना लेखी कळवून अतिक्रमण हटविण्याची मागणी केली.

७)सन्मा.सदस्य श्री. हमीद अल्ताफ अकबरअली यांनी दिनांक २९/०६/२०१७ च्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे जि.प.सदस्यांना ग्रामपंचायतीने मासिक सभा, ग्रामसभा ची नोटीस व प्रोसेडिंग देण्यात यावी तसेच प्रभाग सभा घेण्याबाबत ठरविण्यात आले आहे. परंतू अद्याप पर्यत ग्रामपंचायत सभेची नोटीस व प्रोसेडिंग देत नाही तसेच गटविकास अधिकारी जि.प.सदस्यांची प्रभाग सभा आयोजित करीत नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की, याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना पत्र देण्यांत आलेले आहेत. गटविकास अधिकारी सालेकसा व अर्जूनी मोरगांव यांनी पत्र प्राप्त झाले असुन संबधित सर्व ग्रामसेवक यांना पत्र देण्यात आलेले आहे असे सांगीतले. जर याबाबत काही तक्रार असल्यास संबधित ग्रामसेवक विरुध्द कार्यवाही करण्याचे आश्वासित केले.

८) सन्मा.सभापती श्री. पी. जी.कटरे यांनी ग्रामसभेचा पदसिध्द अध्यक्ष हा सरपंच अध्यक्ष असेल असे सांगीतले.

९) सन्मा.सदस्य श्री. विश्वजीत डोंगरे यानी जि.प. च्या मोडकडीस आलेल्या शाळेच्या बाबतीत निर्लेखन करण्याचा ठराव करण्याची मागणी केली. मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सर्वाची मंजुरी आहे तर सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात यावा सर्वानी सहमती देवून मंजुरी प्रदान केली.

१०) मा.सभाध्यक्ष महोदया यांनी अध्यक्ष यांचे करीता नविन निवासस्थान वाटप केलेले आहे. सदर निवास स्थानमध्ये आवश्यक सुविधा व फर्निचर तसेच साहित्य खरेदी करण्याकरीता कार्यकारी अभियंता यांनी अंदाजे ६.०० लक्ष रुपये निधी आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. करीता मा. अध्यक्ष यांचे शासकिय निवासस्थाना करीता जिल्हानिधी मधून ६.०० लक्ष रुपये उपलब्ध

करण्याकरीता मंजुरी प्रदान करण्यास व ठराव घेण्यास सभेस सहमती मागीतली. सभेने याबाबत सर्वानुमते सहमती दर्शवून मंजुरी प्रदान केली.

११) मा.सभाध्यक्ष महोदया यांनी जि.प.प्रशासकिय इमारतीमध्ये उद्वाहक (Lift) बसविण्याकरीता कार्यकारी अभियंता सा.बा.यांनी अंदाजे ४० लक्ष रुपये निधीची आवश्यकता असल्याची माहिती दिली आहे. करीता सदर निधी शासनाकडुन अंदाजपत्रकासह मागणी करण्याबाबत प्रस्ताव ठरावासह पाठविण्यास सहमती मागीतली. सभागृहाने याबाबत सर्वानुमते सहमती दर्शवून मंजुरी प्रदान केली.

मा.सभाध्यक्ष महोदया यांनी याबाबत ठराव करुन त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेत. तसेच विषय समितीने वेळोवेळी विकास कामाच्या बाबतीत तयार केलेले नियोजन व यादी जि.प.च्या सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ ठेवण्याचे निर्देश सुध्दा सर्व खाते प्रमुखांना दिलेत. आणि सभेच्या माध्यमाने ज्या विषयावर ठराव झालेले आहे त्याची त्वरीत अंमलबलावणी करण्याची सुचना केली.

**<u>विषय क्र. ४ :-</u> सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**<u>ठराव क्र. ४:-</u> सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

हयानंतर सभेसमोर चर्चेला इतर विषय नसल्याने सर्व उपस्थितांनी त्यांच्या विभागाशी संबधीत उपस्थित झालेल्या मुद्यांची नोंद घेवून पुढील १० दिवसांमध्ये प्रश्न निकाली काढण्याची सुचना देवून उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**स्वा/-**

सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया.

**स्वा/-**

अध्यक्ष,
जिल्हा परिषद, गोंदिया

# <u>जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ८.११.२०१७</u>

## <u>कार्यवृत भाग -२</u>

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०८.११.२०१७<br>वेळ दुपारी १.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**<u>विषय क्रमांक. १</u> - मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करणे.**

**<u>ठराव क्रमांक १-</u>** सविस्तर चर्चेअंती मागील जि.प.सर्वसाधारण सभा दिनांक १०.०८.२०१७ च्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र.२:-</u> शासकिय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**<u>ठराव क्रमांक २-</u>** शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या परिपत्रकाची/शासन निर्णयाची माहिती सभागृहास देण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र.३:-</u> मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**<u>विषय क्र.३/१:-</u> जिल्हा पातळीवरील ४% सादिल खर्च करण्यास मंजूरी प्रदान करणे बाबत.**

**<u>ठराव क्र ३/१:-</u>** मा.शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अनुदान वितरण आदेश क्रं. ३८९/२०१७, दिनांक २४.१.२०१७ नुसार रुपये ९४,१३,०००/- व अनुदान वितरण आदेश क्रं. १३७४/२०१७, दिनांक २३.३.२०१७ नुसार रुपये ३३,७४,०००/- असे सन २०१६-१७ मध्ये एकूण रुपये १,२७,८७,०००- (रु. एक कोटी सत्ताविस लक्ष सत्यांशी हजार फक्त) एवढे अनुदान ४% सादिल मध्ये प्राप्त झालेले आहेत.

कार्यालयीन वितरण आदेश क्रं. ३३०/२०१७, दिनांक १६.०२.२०१७ नुसार ४७,०७,०००/- व कार्यालयीन वितरण आदेश क्रं. १०६८/२०१७, दिनांक ३१.३.२०१७ नुसार रुपये १६,८७,०००/- असे एकूण ६३,९४,०००/- (रुपये त्र्येसष्ठ लक्ष चौ-यान्नव हजार फक्त) पंचायत समितींना वितरीत करण्यांत आले आहे. उर्वरित रक्कम रुपये ६३,९३,०००/- (त्रेसष्ट लक्ष त्र्यान्नव हजार फक्त) जिल्हा स्तरावर शिल्लक आहे. त्यापैकी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बांधकाम/ दुरुस्ती करिता ५०% रक्कम रुपये- ३१,९६,५००/- व महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रंमका-पीआरई १०९४/७०४/(दोन) प्राशि-१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४ नुसार प्रपत्र ब मध्ये जिल्हा पातळीवर खरेदी करण्याकरीता ५०% रक्कम रुपये- ३१,९६,५००/- असे खर्च करावयाचे असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सूचविले.

त्यावर दिनांक १५.०७.२०१७ च्या शिक्षण व क्रीडा समिती सभेमध्ये तसेच दिनांक २८.८.२०१७ च्या जिल्हा परिषद स्थायी समिती सभेत जिल्हास्तरावर रुपये ६३,९३,०००/- (त्रेसष्ट लक्ष

त्र्यान्नव हजार फक्त) शिल्लक असलेल्या रक्कमेमधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बांधकाम/ दुरुस्ती करिता ५०% रक्कम रुपये- ३१,९६,५००/- व महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रंमका-पीआरई १०९४/७०४/(दोन) प्राशि-१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४ नुसार प्रपत्र ब मध्ये जिल्हा पातळीवर कार्यालयीन बाबीवर खरेदी करण्याकरीता ५०% रक्कम रुपये- ३१,९६,५००/- असे एकूण रुपये ६३,९३,०००/- (त्रेसष्ट लक्ष त्र्यान्नव हजार फक्त) शासन निकषानुसार खर्च करण्याबाबत मंजूरी प्रदान करण्यात आली असून आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण समिती सभेनी सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**<u>विषय क्र.३/२:-</u> सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात जिल्हानिधी मध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (गावची शाळा आमची शाळा) या उपक्रमात असलेले अनुदान सन २३०१७-१८ मध्ये खर्च करण्याची मंजुरी प्रदान करणेबाबत.**

**<u>ठराव क्र ३/२ :-</u>** सन २०१६-१७ या वर्षामध्ये जिल्हानिधीमध्ये गावची शाळा आमची शाळा या उपक्रमात लेखाशिर्ष १०१-१९/३ मध्ये रु. २०.०० लक्ष अनुदान मंजूर आहे. सदरील अनुदान प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमात वळती करण्यात आले असून जिल्हा परिषद व्यवस्थापनेच्या १०४८ शाळा असून त्यापैकी प्राथमिक शाळा ५८८ पुर्व माध्यमिक ४६० शाळा आहेत. पुर्व माध्यमिक शाळांची संख्या अधिक असल्याने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमात पुर्व माध्यमिक केंद्रातंर्गत शाळामधील स्पर्धा वाढविण्यासाठी प्रथम व द्वितीय उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात यावे व प्राथमिक विभागात एका शाळेला प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे नियोजनाप्रमाणे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या शाळांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्याबाबत ठरविण्यात आले होते.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमात सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्याबाबतचे देयक वित्त विभागास मंजूरीस्तव सादर करण्यात आलेले होते. परंतु काही कारणास्तव सदरील देयके सन २०१६-१७ या वर्षात मंजूर न झाल्यामूळे सदरील उपक्रमातील अनुदान सन २०१७-१८ मध्ये खर्च करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विनंती केली.

त्यावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमातील अनुदान सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात काही कारणास्तव खर्च न झाल्याने सदरील अनुदान सन २०१७-१८ मध्ये खर्च करण्याबाबत दिनांक १४.०८.२०१७ च्या शिक्षण व क्रीडा समिती समिती सभेमध्ये ठराव क्रं. ३/९ नुसार तसेच दिनांक ७.११.२०१७ च्या जिल्हा परिषद स्थायी समिती सभेत विषय क्रं. ३/४ नुसार मंजूरी प्रदान करण्यात आली असून आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण समिती सभेनी सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र.३/३:-</u> समाजकल्याण विभागाअंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील जिल्हा निधी अंतर्गत योजनांवरील शिल्लक तरतुद सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्याची मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र ३/३ :-** सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे योजनानिहाय तरतुद खर्च करण्यात आलेला आहे. तरतुदीच्या अनुषंगाने कमी संख्येत प्रस्ताव प्राप्त झाले असल्याने तरतुद शिल्लक आहे. करीता सदर शिल्लक तरतुद सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्ची करण्यास समाज कल्याण समिती सभा दिनांक २७ एप्रिल २०१७ ने ठराव क्र. ३ नुसार मान्यता देवून जि.प. स्थायी समिती सभेच्या मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

## २०% सेस फंड जिल्हा निधी समाज कल्याण

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन २०१६-१७ ची तरतुद | प्रत्यक्ष खर्च | शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दोनचाकी सायकल पुरविणे | १५,००,०००/- | १४,१६,०००/- | ८४,०००/- |
| २ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना ईलेक्ट्रीक मोटार पुरविणे | ५,००,०००/- | ४,१५,८००/- | ८४,२००/- |
| ३ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना HDPE/ PVC पुरविणे | ८,००,०००/- | ५,९२,९९९/- | २,०७,००१/ |
| ४ | चर्मकारांना चामडे शिलाई मशीन पुरविणे | ४,००,०००/- | १,३८,०००/- | २,६२,०००/- |
| ५ | मागासवर्गीय बेरोजगारांना स्वयंरोजगराकरीता लाउडस्पिकर व शामियाना पुरविणे | १०,८५,८७६/- | ९,६८,०००/- | १,१७,८७६/- |
| ६ | वाचनालयासाठी कपाट पुरविणे | ४०,०००/- | २८,८००/- | ११,२००/- |
| ७ | मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी बँड संच पुरविणे | २०,०००/- | ० | २०,०००/- |
| | **एकुण** | **४३,४५,८७६/-** | **३५,५९,५९९/-** | **७,८६,२७७/-** |

## ३% सेस फंड जिल्हा निधी अपंग कल्याण

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन २०१६-१७ ची तरतुद | प्रत्यक्ष खर्च | शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | अपंगांना/दिव्यांगांना सगणक प्रशिक्षण देणे | २,०३,३२६/- | १,००,०००/- | १,०३,३२६/- |
| २ | अपंगांना/दिव्यांगांना उद्योजकता प्रशिक्षण देणे | २,९५,५५५/- | १,५०,०००/- | १,४५,५५५/- |
| | **एकुण** | **४,९८,८८१/-** | **२,५०,०००/-** | **२,४८,८८१/-** |

करीता समाज कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे २०% सेस फंड जिल्हा निधी योजनांतर्गत एकुण रु. ७,८६,२७७/- (अक्षरी सात लक्ष छ्यांशी हजार दोनशे सत्यात्तर रुपये) व ३% सेस फंड जिल्हा निधी योजनांतर्गत एकुण रु.२,४८,८८१/- (अक्षरी दोन लक्ष अठ्ठेचाळीस हजार आठशे ऐक्यांशी रुपये ) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करण्याची जि.प. स्थायी समिती सभा दिनांक २८.०८.२०१७ ने अतिरिक्त ठराव क्र ६/४ अन्वये मंजुरी प्रदान करुन येणाऱ्या जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव शिफारस केल्याप्रमाणे आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.३/४:- समाजकल्याण विभागाअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील जिल्हानिधी अंतर्गत योजनांवरील तरतुदीचे नियोजनास,योजनेच्या खर्चास तथा मालमत्ता संपादनास मंजुरी मिळणे बाबत.**

**ठराव क्र ३/४ :-** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता जि. प. गोंदिया चे सन २०१७-१८ चे संभाव्य अंदाजपत्रकानुसार विविध योजनांवर तरतुद करण्यात आलेली आहे. समाज कल्याण समिती सभा दिनांक १९ ऑगस्ट २०१७ चे ठराव क्र. ४ नुसार खालील प्रमाणे नियोजनास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ क्र | योजनेचे नाव | सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. | समितीचे नियोजन रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दोनचाकी सायकल पुरविणे | १८,००,०००/- | १८,००,०००/- | |
| २ | मच्छीमार व्यावसायीकांना १०० % अनुदानावर नायलॉन जाळे पुरविणे | ५०,०००/- | ५०,०००/- | |
| ३ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना वलीतीसाठी १०० टक्के अनुदानावर ईलेक्ट्रीक मोटार साहित्य पुरविणे | ५,००,०००/- | ३,००,०००/- | सदर योजनेकरीता लाभार्थ्यांचे अर्ज कमी संख्येत प्राप्त होतात व तरतुद शिल्लक राहते या कारणास्तव रु. २,००,०००/- मागासवर्गीयांना कापड शिलाई मशीन पुरविणे या योजनेवर वळती करणे |
| ४ | मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी बँड संच पुरविणे | २०,०००/- | १,०००/- **टोकण रक्कम** | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद अल्प असल्याने प्राप्त होणाऱ्या अर्जाचे अनुषंगाने योग्य वाटप होत नसल्याने १९,०००/- मागासवर्गीयांना लाउडस्पिकर व शामियाना पुरविणे या योजनेवर वळती करणे |
| ५ | पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे | ८,००,०००/- | ५,००,०००/- | सदर योजनेकरीता लाभार्थ्यांचे अर्ज कमी संख्येत प्राप्त होतात व तरतुद शिल्लक राहते या कारणास्तव रु.३,००,०००/- मागासवर्गीयांना लाउडस्पिकर व शामियाना पुरविणे या योजनेवर वळती करणे |
| ६ | मागासवर्गीयांना रोजगाराकरिता कापड शिलाई मशिन पुरविणे | १५,००,०००/- | १७,००,०००/- | अ.क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे |
| ७ | चर्मकारांना स्वयंरोजगाराकरिता चामडे शिलाई मशिन पुरविणे | २,००,०००/- | २,००,०००/- | |
| ८ | मागासवर्गीय बेरोजगारांना लाउडस्पिकर व शामियाना पुरविणे | ११७६१७६/- | १४,९५,१७६/- | अ.क्र. ४ व ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अपंगाच्या/दिव्यांगांच्या वधुवर परिचय मेळावा सत्कार समारंभ व विवाहास अर्थसहाय्य | १,६०,०००/- | १,६०,०००/- | |
| १० | अपंग/दिव्यांग व्यक्तिंना तीनचाकी सायकल /श्रवणयंत्र करीता अर्थसहाय्य | १,००,०००/- | १,००,०००/- | |
| ११ | अपंगांना/दिव्यांगांना संगणक प्रशिक्षण देणे | २,००,०००/- | २,००,०००/- | |
| १२ | अपंगांना/दिव्यांगांना उद्योजकता प्रशिक्षण देणे /साहित्याचा पुरवठा करणे | ३,९५,६७६/- | ३,९५,६७६/- | |

वरील प्रमाणे नियोजनास, खर्चास तथा मालमता संपादनास जि.प. स्थायी समिती सभा दिनांक २८.०८.२०१७ ने अतिरिक्त ठराव क्र ६/५ अन्वये मंजुरी प्रदान करुन येणाऱ्या जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव शिफारस केल्याप्रमाणे आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.३/५:- सर्वश्री डी.बी.डहाट,आय.जे.शिवणकर व एल.के.शहारे पंपचालक हे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांवर कार्यरत जिल्हा परिषद मार्फत रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन व इतर देय लाभ मिळण्याबाबत.**

**ठराव क्र ३/५ :-**कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी सदर विषयाची सविस्तर टिप्पणी सभागृहासमोर चर्चेकरिता व मंजुरीकरिता ठेवली. परंतू सन्मा. सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर व अन्य सदस्यांनी यास पुढील स्थायी समितीमध्ये मंजुरीकरिता ठेवावा असे मत व्यक्त केले. मा. अध्यक्ष महोदया यांनी सदर विषय पुढील सभेत ठेवण्याचे निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र ३/६ :- गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करणेबाबत.**

**ठराव क्र ३/६ :-**मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी महसुल व वनविभागाच्या दुष्काळ घोषीत करणेबाबद कार्यपध्दती दिनांक ७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीचा अवलंब करुन दिनांक १६/१०/२०१७ पत्र क्रमांक ४१५१ अन्वये गोंदिया जिल्हयामध्ये खरीप हंगाम २०१७ मध्ये दुष्काळ घोषीत करणेबाबद प्रस्ताव राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त (कृषी) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये अर्जुनी/मोर या तालुक्यात मध्यम दुष्काळ व इतर तालुक्यात म्हणजेच गोरेगांव, गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगांव, देवरी सडक/अर्जुनी या सात तालुक्यात गंभीर दुष्काळ घोषीत करावा लागेल असे अभिप्राय मा. जिल्हाधिकारी यांनी नमुद केले आहे. परंतु अर्जुनी/मोरगांव तालुक्यात सुरवातीला पिक परिस्थीती जरी चांगली असली तरी शेवटच्या कालावधीत धान पिकावर किड रोगांचा मोठयाप्रमाणवर प्रर्दुभाव झाल्याने धान पिकाच्या उत्पन्नात

निश्चीतच घट येणार आहे यामुळे अर्जुनी /मोर तालुक्यात देखील गंभीर दुष्काळ घोषीत करावा व या पुर्वी पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे गोरेगांव, गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगांव, देवरी सडक/अर्जुनी या सात तालुक्यात गंभीर दुष्काळ घोषीत करावा. तसेच संपुर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त घोषीत करण्यात यावा असे जिल्हा परिषद सदस्य मा. गंगाधर परशुरामकर यांनी मागणी केली. यावर जिल्हा परिषद सर्वसाधारण समितीचे सर्व सन्मानिय सदस्य यांनी सहमती दर्शविली व संपुर्ण गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र ३/७ :- कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सुधारीत आदीवासी उपयोजने मधील जात वैधता प्रमाणपत्राची अट शिथील करण्याबाबद.**

**ठराव क्र ३/७ :-** सन्मा. सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी कृषि विभागामार्फत अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सुधारित आदिवासी उपयोजनेचे लाभार्थी निवडीकरिता शासन निर्णयामध्ये लाभार्थी पात्रतेच्या अटीमध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी जात वैधताप्रमाणपत्र (Caste Validity) असणे आवश्यक असल्याची अट नमुद केलेली आहे. परंतु अनुसुचित जमाती प्रवर्गातील बऱ्याचशा शेतकऱ्यांकडे जातवैधता प्रमाणपत्र नसल्यामूळे तसेच जात वैधता प्रमाणपत्र फक्त शालेय शिक्षणाकरिता व निवडणूकीकरिताच संबधीत विभागाकडून तयार करुन देण्यात येत असल्यामुळे लाभार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचीत राहातील असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे योजनेचा लाभ घेण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक असल्याची अट शिथील करण्यात यावी असे जिल्हा परिषदेचे सन्माननिय सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी अवगत केले यावर सन्मा. सदस्या रजनीताई कुंभरे यांनी त्यास सहमती दर्शविली. सविस्तर चर्चेअंती सदर जात वैधतेची आवश्यक असलेली अट शिथील करण्याबाबत शासनास पाठपुरावा असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ३/८ :- जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत जि.प.प्राथमिक/ उच्च प्राथमिक/ माध्यमिक शाळांतील धोकादायक /जिर्ण झालेल्या वर्गखोली इमारतीचे निर्लेखन करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्याबाबत. (तालुकानिहाय जिर्ण झालेल्या/ धोकादायक वर्गखोल्या इमारतीचे शाळानिहाय यादी संलग्न आहे)**

**ठराव क्र. ३/८ :-** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत जि.प. च्या प्राथमिक (१ ते ५)-६२६, उच्च प्राथमिक (६ ते ८)-४२२ व माध्यमिक -२१ असे एकूण १०६९ शाळा आहेत. U-DISE २०१६-१७ नुसार जिप. च्या १०६९ शाळांमध्ये ३८१७ वर्गखोल्या आहेत. यापैकी ६३१ वर्गखोल्यांना दुरूस्तीची गरज असून ६७८ वर्गखोल्या जिर्ण व धोकादायक आहेत व २५०८ वर्गखोल्या चांगल्या स्थितीत आहेत.

जि.प. च्या शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कनिष्ठ अभियंत्यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देवून पाहणी अहवालानुसार व त्यानंतर तालुकास्तरावर केंद्रप्रमुख यांच्या बैठका घेवून, जिर्ण झालेल्या, दुरुस्तीच्या पलिकडे गेलेल्या धोकादायक वर्गखोल्याची माहिती सादर केलेली आहे. या जिर्ण झालेल्या, दुरूस्तीच्या पलिकडे गेलेल्या धोकादायक वर्गखोल्याची सदर यादी तालुक्याप्रमाणे शाळांच्या नावासह या सोबत संलग्न आहे.

गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| **तालुका** | **एकूण शाळा संख्या** | **एकूण उपलब्ध वर्गखोल्या** | **चांगल्या स्थितीत वर्गखोल्या** | **दुरूस्तीयोग्य वर्गखोल्या** | **पाडण्यायोग्य शाळा खोल्यांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| अर्जुनी/मोर | १३८ | ४७३ | २७० | १०६ | ९७ |
| आमगांव | ११६ | ७०६ | २६७ | ८३ | ५६ |
| देवरी | १४४ | ४३९ | २९२ | ७६ | ७१ |
| गोंदिया | १८८ | ८५९ | ६२९ | १०० | १३० |
| गोरेगाव | १०९ | ३४७ | २०३ | ५० | ९४ |
| सालेकसा | ११५ | ३८५ | २६४ | ६८ | ५३ |
| स/अर्जुनी | १२० | ३८५ | २३३ | ७२ | ८० |
| तिरोडा | १३९ | ५२३ | ३५० | ७६ | ९७ |
| **एकूण** | **१०६९** | **३८१७** | **२५०८** | **६३१** | **६७८** |

उपरोक्त प्रमाणे यासोबत संलग्न जिल्हा परिषद शाळांमधील जिर्ण झालेल्या दुरुस्तीच्या पलिकडे गेलेल्या, धोकादायक वर्गखोल्यांची शाळानिहाय यादी सन्मा. सदस्यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आली असून या धोकादायक, जिर्ण झालेल्या, दुरुस्तीच्या पलिकडे गेलेल्या वर्गखोल्यांना निर्लेखन करण्याची रितसर आवश्यक कार्यवाही करण्याची आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ३/९ :- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेचा २० टक्के निधी जि.प. सदस्यांनी सुचविलेल्या लाभार्थ्यांकरिता राखीव ठेवण्याबाबत.**

**ठराव क्र. ३/९ :-** जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत पंतप्रधान आवास योजना राबविण्यात येते. सदर योजनेकरिता लाभार्थ्यी निवड करतांना सामाजिक, आर्थिक व जात सर्व्हेक्षण २०११ नुसार तयार केलेल्या यादीचा आधार घेण्यात येतो. परंतू सदर सर्व्हे होऊन ६ वर्षे पूर्ण झाल्यामुळे ज्यांना घरकुल आवश्यक आहे अशा गरजू व्यक्तींची नांवे या यादीत नाहीत असे सन्मा. सदस्य श्री. गिरीश पालीवाल यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. जे बेघर असुनही प्रतिक्षा यादीत ज्यांचे नांव नाही अशा व्यक्तींना प्राधान्याने घरकुलाचा लाभ देणे आवश्यक आहे. यास सन्मा.सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर,

श्री. रमेश अंम्बुले, श्री. सुरेश हर्षे, श्री. दिपकसिंह पवार, सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर, श्रीमती रजनी कुभंरे, श्रीमती सिमा मडावी व अन्य उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होवून प्रतिक्षा यादीत नांव नसलेल्या गरजू व्यक्तींना घरकुलाचा लाभ देता यावा याकरिता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेचा २० टक्के निधी जि.प. सदस्यांनी सुचविलेल्या लाभार्थ्यांकरिता राखीव ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले. यावर मा. सभाध्यक्ष महोदया यांनी सदर आशयाचा ठराव करुन शासनास पाठवून पाठपुरावा करण्याचे निर्देशित केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र. ३/१० :-</u> अध्यक्ष, जिल्हा परिषद,गोंदिया यांचे शासकिय निवास स्थानामध्ये आवश्यक सुविधा, फर्निचर तसेच इतर साहित्य खरेदी करणेकरिता जिल्हा निधीतून रु.६.०० लक्ष वळती करण्याबाबत.**

**<u>ठराव क्र. ३/१० :-</u>** मा.अध्यक्ष जि.प. गोंदिया करीता नविन प्रशासकिय ईमारत तयार असुन सदर ईमारती मध्ये आवश्यक सुविधा, फर्निचर तसेच इतर साहित्य खरेदी करण्याकरीता जिल्हा निधीतून रु.६.०० लक्ष निधीची आवश्यक्ता असल्याचे उप विभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता जि.प. यांनी मा.अध्यक्ष याचे निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यानुसार मा.सभाध्यक्ष महोदया यांनी निधी वळती करण्यास सभेची सहमती मागीतली सभेन जिल्हानिधीतून रु.६.०० लक्ष रुपये सदर कामाकरीता वळती करण्याबाबत सहमती प्रदान केलेली केली. करीता सदर निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी योग्य लेखाशिर्षकाखाली वळती करुन त्यानुसार उप विभागीय अभियंता कार्यकारी अभियंता जि.प.यांनी नियमानुसार कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र. ४ :-</u> सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**<u>ठर ाव क्र. ४:-</u> सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**स्वा/-**

सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया.

**स्वा/-**

अध्यक्ष,
जिल्हा परिषद, गोंदिया

# जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १५.१२.२०१७
## कार्यवृत्त भाग - २

| दिनांक व वेळ | उपस्थित पदधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक १५.१२.२०१७<br>वेळ दुपारी ११.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**विषय क्र. १:- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्र. १:-** सविस्तर चर्चेअंती मागील जि.प. सर्वसाधारण सभा दिनांक ०८.११.२०१७ च्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २ :- सन २०१७-१८ ची दरसुची (CSR) मंजूर करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक २ :-** सन २०१७-१८ करीता दरसुची CSR शासनाकडून मंजूरी झाल्यानुसार आजची स्थायी समिती सभा सन २०१७-१८ ची दरसुची CSR ला सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३ :- सौदंड विश्रामगृहमध्ये खाणसामा रोजंदारीवर नियुक्त करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक ३ :-** जि.प. उप विभाग सडक/अर्जुनी अंतर्गत सौदंड विश्रामगृह मध्ये खाणसामा नियुक्त करण्याकरीता स्थायी समिती सभा दिनांक ४.१२.२०१७ चे अतिरीक्त ठराव क्रमांक ४/५ मध्ये मंजूरी दिल्यानुसार आजची सर्वसाधारण सभा सौदंड विश्रामगृह येथे रोजंदारीवर खाणसामा नियुक्त व अर्थसंकल्पीय बजेट मध्ये जिल्हा निधी मधून तरतूद करण्याकरीता मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४ :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा वित्तीय वर्ष २०१७-१८ चा पुरक नियोजन आराखडा व वित्तीय वर्ष २०१८-१९ चा नियोजन (यंत्रणा व ग्रामपंचायतींचा) आराखडयास मंजूरी प्रदान करणेबाबद.**

**ठराव क्रमांक ४ :-** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) जिल्हा परिषद, गोंदिया यांनी आज गोंदिया जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत (यंत्रणा व ग्रामपंचायतीचा) वित्तीय वर्ष २०१७-१८ चा पुरक नियोजन आराखडा व वित्तीय वर्ष २०१८-१९ चा नियोजन आराखडा सभागृहासमोर सादर केलेला असून त्यास महाराष्ट्र शासन नियोजन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक रोहयो-२००६/प्र.क्र.१/रोहयो-१० दिनांक ९ ऑगष्ट २००६ चे परिशिष्ट १(७) अन्वये आजची जि.प. सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजूरी प्रदान करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ५ :- श्री डी.बी. डहाट, श्री.आय.जे. शिवणकर व श्री एल.के. शहारे पंपचालक हे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनावर कार्यरत जिल्हा परिषद मार्फत रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन व इतर देय लाभ मिळण्याबाबत.**

**ठराव क्र. ५ :-** प्रादेशिक पाणी पुरवठा योजनावर कार्यरत जिल्हा परिषदामार्फत रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी श्री डी.बी. डहाट, श्री आय.जे. शिवणकर व श्री एल.के. शहारे, पंपचालक ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जि.प. गोंदिया यांना सेवा निवृत्ती वेतन व इतर आनुषंगीक लाभ लेखाशिर्ष-जिल्हा निधी देखभाल दुरुस्ती (२२१५-१०८-२७) सेवानिवृत्त वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन इतर लाभासाठी योग्य कार्यवाही करण्याचे जिल्हा परिषद सर्वसाधारण समिती सभा मंजूरी प्रदान करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ६ :- जिल्हा परिषद, गोंदियाचे सन २०१६-१७ चे वार्षिक लेख्यास मंजूरी प्रदान करणेबाबद.**

**ठराव क्र. ६ :-** जिल्हा परिषद, गोंदियाचे सन २०१६-१७ चे वार्षिक लेख्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेनी मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ७ :- जिल्हा परिषद, गोंदियाचे सन २०१६-१७ चे वार्षिक प्रशासन अहवालास मंजूरी प्रदान करणेबाबद.**

**ठराव क्र. ७ :-** जिल्हा परिषद, गोंदियाचे सन २०१६-१७ चे वार्षिक प्रशासन अहवालास व अहवाल शासनास सादर करण्याकरीता आजच्या सर्वसाधारण सभेनी मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ८ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्र. ८ :-** विभागाकडे प्राप्त शासकिय परिपत्रक सन्मा.सदस्यांना उपलब्ध करुन देण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ९ :- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्र. ९/१ :- सन २०१७-१८ करीता शासन निधी विशेष घटक योजना (SCP) व जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना बाहेरील (TSP/OTSP) प्राप्त निधीस वैयक्तिक लाभाच्या योजने करीता खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्र. ९/१ :-** सन २०१७-१८ करीता शासन निधी विशेष घटक योजना (SCP) व जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना बाहेरील (TSP/OTSP) प्राप्त निधीस वैयक्तिक लाभाच्या योजने करीता खालीलप्रमाणे खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

| अ.क्र. | योजनेचे नांव व लेखाशिर्ष | सन २०१७-१८ मंजूर नियतव्यय | सन २०१७-१८ प्राप्त निधी |
|---|---|---|---|
| १ | शासन निधी-विशेष घटक योजना (SCP) CRC-N०६ | ५०,००,०००/- | ३५,००,०००/- |
| २ | शासन निधी-जिल्हा वार्षिक उपयोजना (TSP) TX२८०००१ ३१ सहाय्यक अनुदाने | २३,००,०००/- | २३,००,०००/- |
| ३ | शासन निधी-जिल्हा वार्षिक उपयोजना (OTSP) TX२८०००१ ३१ सहाय्यक अनुदाने | ३,६३,०००/- | ३,६३,०००/- |
| | **एकूण** | **७६,६३,०००/-** | **६१,६३,०००/-** |

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ९/२</u> :- जिल्हा परिषदेच्या मालकी अंतर्गत येणाऱ्या अचल संपत्तीची नोंदी अद्यावत करण्यासाठी कंत्राटी मानधन तत्वावर सेवा निवृत्त महसूल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यास मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**<u>ठराव क्र. ९/२</u> :-** महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता १९६८ च्या नियम ९७ अन्वये जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या जंगम मालमत्ता जसे ईमारती, तलाव, मोकळी जागा, शेतीची जागा ईत्यादी चे ७/१२ किंवा आखिव पत्रिका तसेच जागेचा नकाशा प्राप्त करुन जमिनीची मोजनी संबंधीत तालुक्याच्या भुमापन अधिकाऱ्याकडून करण्यात यावी. त्यासाठी बाहय यंत्रणा जसे सेवानिवृत्त महसूल अधिकारी/कर्मचारी (नायब तहसीलदार/मंडळ अधिकारी/तलाठी) कडून प्रस्ताव मागवून नियुक्ती करुन त्यांना जिल्हा निधीतून सदर कामासाठी मासिक वित्तलब्धी देण्याचे सभेने सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ९/३</u> :- सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत निर्लेखीत केलेल्या एकूण ५ वाहनांची विक्री करण्यास मंजूरी मिळण्याबाबत.**

**<u>ठराव क्र. ९/३</u> :-** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत खालील निर्लेखीत एकूण ०५ वाहनांना विक्री करीता विक्री आदेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | बोलीधारकांची बोलीची रक्कम | बोलीधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | एम.एच.३५डी-१४९ टाटा सुमो (डिझेल) | ४५०००/- | श्री अजय हंसाराम हेमणे |
| २ | एम.एच.३५डी-२०१ अम्बेसीडर कार (पेट्रोल) | ३२००/- | श्री रमेश हजारे |
| ३ | एम.एच.३५डी-७७७ अम्बेसीडर कार (पेट्रोल) | १३०००/- | श्री रमेश हजारे |
| ४ | एम.एच.३५डी-३४६ टाटा मांझा कार (पेट्रोल) | ४५०००/- | श्री रमेश हजारे |
| ५ | एम.एच.३५डी-३५१ टाटा मांझा कार (पेट्रोल) | ६००००/- | श्री विजय डीस्मेल्टींग, नागपूर |
| | **एकूण** | **१६६२००/-** | |

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ९/४</u> :- जिल्हा निधी सन २०१७-१८ अंतर्गत शिक्षण सेवक भरती संगणक देखभाल दुरुस्ती, ई लर्निग साप्टवेअर खरेदी करणे तसेच विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे करीता एकुण रु १३.५० लक्ष ची तरतूद मंजुर असुन सदर निधी या आर्थिक वर्षात खर्च होणार नसल्याने सदर निधी जि.प.प्रा.शाळांतील शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता वळती करण्याची मंजुरी प्रदान करणेबाबत.**

**<u>विषय क्र. ९/४</u> :-** जिल्हा निधी सन २०१७-१८ अंतर्गत शिक्षण सेवक भरती संगणक देखभाल दुरुस्ती, ई लर्निग साप्टवेअर खरेदी करणे तसेच विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे करीता एकुण रु १३.५० लक्ष ची तरतूद मंजुर असुन सदर निधी या आर्थिक वर्षात खर्च होणार नसल्याने सदर निधी जि.प.प्रा.शाळांतील शाळा गृह कंपाऊंड वाल बांधकाम दुरुस्ती करीता वळती करण्याची मंजुरी प्रदान केली व खालील प्रमाणे लेखाशिर्षनिहाय शिल्लक निधी वळती करण्यास मंजुरी प्रदान केली.

| अ.क्र. | लेखाशिर्षे | बाब | मंजुर अनुदान |
|---|---|---|---|
| १ | १०१-१३/१ | शिक्षण सेवक भरतीसाठी लागणारा कार्यालयीन खर्च | १.५० |
| २ | १०१-१७ | संगणक देखभाल दुरुस्ती व संगणक व प्रिंटर खरेदी | ५.०० |
| ३ | १०१-१९/४ | ई-लर्निग, सॉप्टवेअर खरेदी करणे | ५.०० |
| ४ | १०१-१९/९ | विद्यार्थ्यांना ओळखपत्र पुरविणे | २.०० |
| | | एकुण | १३.५० लक्ष |

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. १० :- सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. १० :-** सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

स्वा/-
सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/-
अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया

# जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १३.०३.२०१८
## कार्यवृत्त भाग - १

| दिनांक व वेळ | उपस्थित पदधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक १३.०३.२०१८<br>वेळ दुपारी १.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १३.३.२०१८ ला दु. १.०० वा. मा. श्रीमती सीमा मडावी अध्यक्षा, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सभेला विषय समितीचे सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) तथा सचिव स्थायी समिती, जिल्हा परिषद व इतर खात्याचे विभागप्रमुख, खंड विकास अधिकारी, उपविभागीय अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

**विषय क्र. १:- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्र. १:-** मागील कार्यवृत्तावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, नविन मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा नविन शिक्षणाधिकारी रुजू झाले असतांना शिक्षक संघटना निवेदने देण्यास येतात. परंतू विद्यार्थीवर झालेल्या अत्याचाराबाबत शिक्षक संघटना जागरुक आहेत काय? याबाबत मुद्या उपस्थित केला. नंगपूरा/मुर्री येथील शाळेतील विद्यार्थीनीवर शाळेतील शिक्षकांकडून विनयभंग झाल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. याकडे लक्ष देण्याचे काम मुख्याध्यापक यांचे आहे. संबंधीत शिक्षकाला निलंबीत करण्यात आलेले आहे. परंतू मुख्याध्यापक यांना या प्रकरणाची कल्पना असतांनाही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. २० ते २५ दिवस झाल्यानंतरही याबाबत मुख्याध्यापक यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. मुख्याध्यापकाने प्रकरण दडपण्याचे कारण काय? शिक्षकाबरोबरच मुख्याध्यापक यांनाही निलंबीत करण्याची मागणी केली. सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी अनुमोदीत केले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनीही सन्मा. सदस्यांच्या मताला समर्थन दिले व भविष्यात याप्रकारच्या घटनेची पुरावृत्ती होऊ नये याकरीता, शिक्षकाला बडतर्फच नाहीतर भविष्यात कुठेही नौकरी लागू नये याप्रकारे कार्यवाही करुन शासनास सादर करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे यांनी जिल्हयात अशाच प्रकारच्या अनेक घटना ३-४ वर्षात घडल्याचे निदर्शनास आणून दिले. अशा घटनेची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये याकरीता उत्कृष्ट नियोजन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अधिकारी यांचे अगोदर मा. अध्यक्ष महोदया यांनी मुख्याध्यापकावर कार्यवाही करण्याची मागणी केली. भोसा येथील शिक्षक २४ तांस दारु पिऊन राहतो. तसेच जिल्हा परिषद मधील श्री.पारधीकर, लिपीक सध्या शिक्षण विभागात कार्यरत आहे, पुर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालयात कार्यरत होते असे काही कर्मचारी दारु पिऊन राहत असल्याचे

निदर्शनास आणून दिले.अशा कर्मचारी यांचेवरही कार्यवाही करण्याची मागणी केली. सन्मा. सदस्या श्रीमती खुशबू टेंभरे यांनी अवगत केले की, कटंगी शाळेला भेट दिली असता शिक्षीकेला आपण कोणत्या वर्गात शिकवीत आहो याचीही माहिती नव्हती. सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी मुख्याध्यापकावर कोणती कार्यवाही करावी याचा निर्णय आजच्या सभेत घेण्याचे मत व्यक्त केले. तसेच अशा प्रकारच्या घटना झाल्यास गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली. याबाबत सर्व शिक्षकांची एक दिवसाची कार्यशाळा घेऊन याबाबत अवगत करावे. सदर प्रकरणावर माहिती देतांना शिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, संबंधीत शिक्षकास २४ तासाचे आत निलंबीत करण्यात आलेले आहे व मुख्याध्यापक यांची ३ दिवसांचे आत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे. तसेच अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती झाल्यास संबंधीतावर त्वरीत कार्यवाही करण्यात येईल याबाबत जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील सभेत माहिती देण्यात येत आहे. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अशाच प्रकारची घटना फुक्कीमेटा येथे झाल्याचे निदर्शनास आणून सदर प्रकरणाचा कार्यवाही अहवाल कुठे आहे? याबाबत विचारणा केली. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनीही फुक्कीमेटा प्रकरणाला दोन वर्ष झाल्याचे सांगितले. त्यामूळे नंगपुरा/मुर्री प्रकरणात मदत करणाऱ्या मुख्याध्यापकावरही कार्यवाही होण्याचे मत व्यक्त केले. यावर शिक्षणाधिकारी यांनी चौकशी अहवाल आल्यानंतर संबंधीतावर कार्यवाही करणार असल्याचे सांगितले. सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनीही सदर प्रकरणावर अत्यंत नाराजी व्यक्त केली व मुख्याध्यापक यांची चौकशी करण्याची मागणी केली. मा. अध्यक्ष महोदया यांनी नंगपुरा/मुर्री व फुक्कीमेटा येथील प्रकरणे भविष्यात होऊ नये याकरीता संबंधीतावर कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे सांगितले व मुख्याध्यापक यांची चौकशी करुन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यावर वरिलप्रमाणे चर्चा केलेल्या सदस्यांनी आधी कार्यवाही नंतर चौकशी करण्याची मागणी केली. सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी मा. अध्यक्ष महोदया यांचे वतीने मुख्याध्यापक यांचेवर कार्यवाही करण्यात येईल अशी घोषणा केली. तसेच सन्मा. सदस्यांनी शाळा/शासकीय वेळेत दारु पिण्याऱ्या शिक्षक/कर्मचारी/अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची मागणी केली. सन्मा. सदस्य श्री रजनी कुंभरे यांनी अवगत केले की, कोयलारी येथील शाळेत मुख्याध्यापक यांनी १५ ऑगष्ट व २६ जानेवारीला नेहमीच्या ठिकाणी झेंडावंदन न करता इतरत्र ठिकाणी झेंडावंदन केले. मुख्याध्यापक यांना कोणत्याही ठिकाणी झेंडावंदन करण्याचे अधिकार आहेत काय? अशी विचारणा करुन कार्यवाही करण्याची मागणी केली. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी सदर मुद्याला समर्थन देऊन कार्यवाही करण्याची मागणी केली.

मुद्या क्रमांक १ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, विंधन विहिरीकरीता लागणारे पाईप यावर स्थायी समिती व सर्वसाधारण सभेतही चर्चा करण्यात आलेली आहे. सदर कामाकरीता निधी प्राप्त असून व साहित्य खरेदीस मान्यता दिल्यानंतरही पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झालेले नाही. अनुपालनात आणखी १५ दिवस लागणार असे नमुद आहे. बराच कालावधी होऊनही साहित्य कां वाटप केले नाही? याबाबत विचारणा केली. सन्मा. सभापती श्री अरविंद शिवणकर यांनी अवगत केले की, ७ महिन्या अगोदर पाईपची मागणी करण्यात आली होती. निधी मंजूर असून ३ महिन्याचा कालावधी होऊनही साहित्य वाटपाची कार्यवाही कां करण्यात आली नाही? पाणीटंचाई

हा महत्वाचा विषय असल्यामूळे सदर कामाकरीता निधी वळती करण्यात आला होता. परंतू साहित्य प्राप्त न  झाल्यामूळे निधी वळती करण्याचा काय फायदा झाला? अशी विचारणा केली. सन्मा. सभापती तिरोडा यांनीही पं.स.च्या मागणीनुसार पाईप न मिळाल्यामुळे नाराजी व्यक्त केली. सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे यांनी हातपंप कर्मचारी यांचे मागील ७ महिन्यापासून वेतन दिले नसल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. सदर मुद्यास सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर, सन्मा. सदस्या श्रीमती ऊषाताई मेंढे, सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर, सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी दुजोरा दिला व पाणीटंचाईबाबत नियोजन करण्याचे सुचविले. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, क्षेत्रनिहाय भेट देऊन लागणाऱ्या साहित्याची माहिती मागीतली आहे. ज्या ठिकाणी आवश्यकता नाही, त्या ठिकाणी पाईप जास्त जाऊ नये याकरीता प्रत्यक्ष तपासणी करणे आवश्यक होते. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, १४ व्या वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहे. सदर शिल्लक निधी हातपंप दुरुस्तीकरीता व साहित्य खरेदी करीता जि.प.स्तरावर ठरविण्यांत आलेल्या साहित्याच्या मापदंडानुसार खरेदी करण्याची अनुमती प्रदान करण्याची मागणी केली. सदर निधीचे योग्य नियोजन केल्यास हातपंप दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागू शकतो.

मुद्या क्रमांक १९ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, आरोग्य विभागाशी संबधित सावित्रीबाई फुले कन्या योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वाटप करावयाचे NSC व नगदी मध्ये अफरातफर झाल्याचा मुद्या उपस्थित करण्यात आला होता. मागील सभेत कार्यवाही अहवाल सादर करण्याचे ठरले होते. परंतू कार्यवाही अहवाल सादर करण्यात आलेला नाही. याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याची मागणी केली. सन्मा. सदस्य श्री सुखराम फुंडे यांनी सदर प्रकरणाची चौकशी उच्च स्तरीय समिती कडून करुन सदर अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, दिनांक १५ डिसेंबर २०१७ च्या सभेत सदर प्रकरणाची चौकशी सुरु असून तपासणी करण्यास अडचणी येत असल्याबाबत माहिती देण्यात आली होती. परंतू ३ महिन्याचा कालावधी होऊनही चौकशी अहवाल सभेत सादर करण्यात आलेला नाही. सदर प्रकरणात किती निधीची अफरातफर झालेली आहे याबाबत माहिती सांगावी. सन्मा. सदस्य श्री चुऱ्हे यांनी सर्व पात्र लाभार्थी यांना NSC वितरीत झालेली आहे काय? तसेच सदर अफरातफरचा विषय आरोग्य समितीमध्ये आजपर्यंत आलेला नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे. यावर श्री मडावी, मु.ले.वि.अ. यांनी चौकशी अहवालाची सविस्तर माहिती सभागृहाला वाचुन दाखविली. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे, सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे, सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे व सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सदर चौकशी अहवालाची प्रत देण्याची मागणी केली. सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी सदर अफरातफर ही जवळपास रु. १.०० कोटीची आहे. सदर प्रकरण किती दिवसांत मार्गी लागणार याबाबत विचारणा केली तसेच पात्र लाभार्थीपैकी किती लाभार्थी यांना NSC प्राप्त झालेली आहे. याबाबतही माहिती द्यावी. यावर आरोग्य विभागाचे प्रतिनीधी यांनी शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती दिली व ६४५ लाभार्थी यांना लाभ देण्यात आलेला असून ३५ लाभार्थी लाभ देण्यास शिल्लक आहेत असे सभेत अवगत केले. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी विचारणा केली की, किती बेरर धनादेशावर स्वाक्षरी

झालेल्या होत्या व त्या धनादेशाचे काय झाले? सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी दिनांक २४.४.२००७ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासनास माहिती सादर करणे बंधनकारक असल्याचे सांगितले. जे अधिकारी/कर्मचारी या प्रकरणात दोषी असेल त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल हाणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्य श्री कुंदन कटारे यांनी सदर प्रकरणास ३ वर्ष झाल्यांनतरही कार्यवाही झाली नसल्याने नाराजी व्यक्त केली. तसेच अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याचा अधिकार सभेस आहे काय? याबाबत विचारणा केली. सविस्तर चर्चेअंती सभेस कार्यवाहीचे अधिकार नाहीत परंतू कार्यवाही करण्याचा ठराव घेऊन शासनास सादर करता येतो.

सन्मा. सदस्या श्रीमती ऊषाताई मेंढे यांनी पेंन्शन अदालत वेगवेगळया विभागात न घेता पुर्वीप्रमाणे एकाच ठिकाणी घेण्याचे सुचविले. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांनी शासन निर्णयाप्रमाणे त्या-त्या विभागाने पेंशन अदालत घेणे शासनाचे परिपत्रकानुसार बंधनकारक असल्याचे सांगितले. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे असे सभागृहात सांगीतले. सन्मा. सदस्य श्री पी.जी.कटरे यांनीही पेंशन अदालत पुर्वीप्रमाणे एकाच ठिकाणी घेण्याचे सुचविले. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी शासन निर्णय वाचुन सभेस अवगत केले व त्यानुसार पेंशन अदालत ही वेगवेगळी न घेता पुर्वी प्रमाणेच घेण्याची कार्यवाही करावी असे सुचित केले तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य यांनी सभेची दिशाभुल करु नये असे निर्देश दिलेत.

तसेच सन्मा. सदस्या श्रीमती ऊषाताई मेंढे यांनी हातपंप कर्मचारी यांचे वेतन सर्व पंचायत समिती येथे एकसारखे देण्याचे मत व्यक्त केले. हातपंप कर्मचारी यांचे वेतनात तालुकानिहाय तफावत आहे. ती दुर करुन एकसारखे वेतन करण्यात यावे. सन्मा सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनीही हातपंप कर्मचारी यांचे एकसारखे वेतनावर सहमती दर्शविली व वेतन वेळेवर देण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री अरविंद शिवणकर यांनी रिक्त झालेल्या ठिकाणी नविन हातपंप कर्मचारी यांची पदभरती करणे आवश्यक नाही काय? याबाबत विचारणा केली. अ/मोरगांव येथे हातपंप कर्मचारी यांचे पदे रिक्त आहेत. कर्मचारी नसल्यामुळे नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्यास अडचणी निर्माण होत आहे. पदभरती करणे शक्य नसल्यास ज्या पंचायत समिती अंतर्गत अतिरीक्त कर्मचारी आहे त्यांचे समायोजन करुन अ/मोरगांव येथील रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, आमगांव येथिल ८ ग्रामपंचायती अंतर्गत कोटयावधीची कामे झालेली आहेत. परंतू सदर आठही ग्रामपंचायतीचे नगर परिषद मध्ये रुपांतर झाल्यामुळे कोटयावधीचे पेमेंट करण्यास अडचण निर्माण झालेली आहे. ग्रामविकास व नगर रचना हे दोन वेगवेगळे विभाग आहेत. त्यामुळे MREGS अंतर्गत कुशल-अकुशलची कामेही थांबलेली आहेत. मागील दोन वर्षापासून कामे बंद आहेत व पेमेंटही झालेले नाहीत. नगर परिषद झाल्यामुळे ८ गांवे नियोजनातून वगळण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर ८ गावांचा नियोजनात समाविष्ट करता येत नाही. पेमेंट कसा मिळेल याबाबत उत्तर मिळणे आवश्यक आहे. कामाचा निधी कसा देता येईल व नविन कामे कशी मंजूर करता येईल याबाबतचा ठराव घेऊन शासनास सादर करण्याचे मत व्यक्त केले. तसेच देयके अदा करण्याबाबत पाठपुरावा करावा व कुशल-अकुशलची देयके त्वरीत अदा करण्यात यावी अशी मागणी

केली. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, ग्राम पंचायत असतांना कुशल-अकुशलची कामे पुर्ण झाल्या नंतर नगर परिषद निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्यांना त्यांचा निधी मिळणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी झालेल्या कामाचा निधी मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. यावर खंड विकास अधिकारी यांनी जी कामे पुर्ण झालेली आहेत त्या कामांचा निधी दिलेला आहे व अपूर्ण असलेल्या कामांचा निधी मिळण्याबाबतची माहिती सादर केलेली असल्याची माहिती सभागृहाला दिली. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेसोबत चर्चा करुन सदर प्रश्न मार्गी लावण्यात येईल अशी माहिती दिली.

मुद्या क्रमांक ५ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री तरोणे यांनी CSR चे दर शासनाने ठरवून दिलेले आहेत. माझा विषय रेती रॉयल्टीचा आहे. अंदाजपत्रक तयार करतांना DSR मध्ये रेतीचे दर रु. १०००/- ते १५००/- क्युबिक मिटर असतांना CSR नुसार फक्त ४६३/- दर आकारण्यात येत आहे. CSR नुसार रु. १३१०/- प्रती ब्रास व DSR नुसार रु. ३०००/- ते ४०००/- प्रती ब्रास दर आकारले जातात. सदर दरात एवढी तफावत असल्यामुळे दरात दुरुस्ती करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ठरविण्यात आलेल्या दरानुसारच आकारणी करण्यात यावी. महाराष्ट्राने ठरवून दिलेल्या दरात जिल्हयाची परिस्थिती पाहून DSR चे दर निश्चित केले जाते अशा प्रकारची तरतूद नियमात आहे व त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांनी दर निश्चित केलेले आहे. सदर दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करतांना कार्यवाही अपेक्षित असल्याचे मत व्यक्त करुन याबाबत योग्य निर्णय घेण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनी मुद्या क्रमांक ६ चे अनुपालन बरोबर आले नसल्याचे अवगत केले.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी मुद्या क्रमांक ८ चे अनुपालन बरोबर नसल्याचे अवगत केले. जिल्हा परिषदेच्या रस्त्यांवर काम करतांना जिल्हा परिषदेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे व कैलास पटले यांनी विषय क्रमांक ९/४ वर चर्चा करतांना शिक्षण सेवक भरती, संगणक देखभाल दुरुस्ती व ई-लर्निंग साफ्टवेअर खेरदीचा निधी जि.प.प्रा. शाळांतील शाळा गृह कंपाऊंड वॉल बांधकाम दुरुस्ती वर वळती करणे गरजेचे नसल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आर्थिक वर्ष संपायला ४ महिने शिल्लक असतांना सदर निधी खर्च होणार नाही याची माहिती आधीच मिळाली होती काय? याबाबत विचारणा करुन नाराजी व्यक्त केली. अशाप्रकारे चुकीचा निर्णय करु नये. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी यानंतर अंदाजपत्रकामध्ये ज्या कामाचा निधी मंजुर आहे त्याच कामावर खर्च करण्यात यावा असे निर्देश दिले.

वरिलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन मागील सभेच्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**विषय क्रमांक २:- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्रमांक २:-** शासकीय परिपत्रकाचे वाचन करण्यात आले. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी दिनांक १ मार्च २०१८ चा शासन निर्णय रद्य करण्याचा ठराव घेऊन शासनास सादर करण्याचे मत व्यक्त केले. सदर शासन निर्णयामुळे प्रस्तावाला वेळीच मान्यता मिळणार नाही व त्यामुळे निधी खर्च

होण्यास अडचण निर्माण होईल. सदर शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषदेच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न होत आहे. करीता सदर शासन निर्णय रद्य करुन पुर्वीप्रमाणेच अधिकार बहाल करण्याचे मत व्यक्त केले. यास सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी दुजोरा दिला. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी वरील प्रस्तावाला सहमती दर्शविली. यावर. मा. अध्यक्ष महोदया यांनी दिनांक १ मार्च २०१८ चा शासन निर्णय सन्मा.सदस्यांनी उपस्थित केल्यानुसार सदर निर्णयातील ४(ब) रद्य करण्याचा ठराव सविस्तर नमुद करुन ठराव शासनास पाठविण्याची सुचना केली.

सर्व परिपत्रक तसेच शासन निर्णय वाचल्यास बराच कालावधी निघुन जाईल. करती परिपत्रकाचे व शासन निर्णयाचे वाचन न करता सर्व जि.प. सदस्यांना बंच तयार करुन वितरीत करण्यात यावे. असे मागील सभेत ठरले होते. असे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सभागृहास अवगत केले.

**विषय क्र. ३ :- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्र. ३/१ :- वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३४७, एम.एच.३५ डी-३४८, एम.एच.३५ डी-३५०, एम.एच.३५ डी-७९९, एम.एच.३५ डी-१९९, एम.एच.३५ डी-३४९ व एम.एच.३५ ए-९९०५ या एकूण ७ वाहनास निर्लेखीत करण्यास व त्या वाहना ऐवजी एकूण ६ नविन वाहन खेदी करण्याची मंजूरी मिळण्याबाबत.**

**ठराव क्र. ३/१ :-** सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, संपूर्ण कागदपत्र जोडून पुढील स्थायी समिती समोर ठेऊन मंजूरी प्रदान करण्यात आल्यानंतर सर्वसाधारणे सभेत ठेवण्यात येईल, असे ठरले असतांनाही सदर विषय आजच्या सर्वसाधारण सभेत कां ठेवण्यात आला. सोबत उपविभागीय परिवहन अधिकारी चे प्रमाणपत्र जोडलेले नाही. तसेच स्थायी समिती सभेने मंजूरी न देता सदर विषय सर्वसाधारण सभेत कां आला? याबाबत विचारणा केली. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांचे मताशी सहमत असल्याचे सांगितले. परंतू सदर विषय हा महत्वाचा असून व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती यांना वाहनाची अत्यंत आवश्यकता असल्यामूळे सदर विषयास मंजूरी देण्यास हरकत नसल्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनीही सदर विषय मंजूर करण्यास सहमती दर्शविली.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, प्रचलीत पद्धतीचा अवलंब न केल्यामूळे आमचा २० सदस्यांचा विरोध नोंदवावा असे मत व्यक्त केले.

मा. अध्यक्ष महोदया यांनी आदेश केल्यानंतरही उप मुकाअ यांनी पेंशन अदालत संबंधीत विभागाने घेण्यसंबंधीचा शासन निर्णयाची प्रत अद्याप दाखविली नाही. यावर मा.अध्यक्ष यांनी पेंशन अदालत एकत्रच घेण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, अंगणवाडी सेविकेचे प्रकरणे सुप्रीम कोर्टात गेलेले आहे. ज्या वकीलाला सदर प्रकरण दिलेले आहे त्यांनी आजपर्यंत कोर्टात प्रकरण दाखल केलेले नाही. तसेच सदर वकिलाची फी ही रु. १.०० लक्ष आहे. इतर वकील रु. ५०,०००/- फी घेतात. तसेच जे वकील नेहमी जि.प. प्रकरणे सुप्रीम कोर्टात हाताळतात व त्यांची फी सुद्धा कमी असतांना उप मु.का.अ. यांनी सदर प्रकरण इतर वकीलाला देण्याचे कारणकाय? यावर उप मुकाअ यांनी सदर वकीलाची

नियुक्ती आपण केली नसल्याचे सांगितले. समितीने जातीचा दाखला नाकारला होता व याप्रकारचे प्रकरणे भविष्यात आणखी उद्भऊ नये याकरीता सदर प्रकरण कोर्टात दाखल करण्याचा शेरा उप मुकाअ (सा) यांनी दिलेला असल्याचे बालकल्याण विभागाचे प्रतिनिधी यांनी सभेत माहिती दिली. चर्चा करुन जि.प.च्या एकूण ७ वाहनास निर्लेखीत करण्यास व त्या ऐवजी ७ नविन वाहन खरेदी करण्यास आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव बहुमताने मंजूर**

**विषय क्र. ३/२:- जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ या वर्षातील प्राथमिक शाळा इमारत बांधकामासाठी जि.प.ला अनुदान (३४५१२६९३) या लेखाशिर्षका अंतर्गत मंजूर वर्गखोली बांधकामाच्या नावांत बदल करण्याबाबत.**

**ठराव क्र. ३/२:-** सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी तिरोडा येथे २०१७-१८ मध्ये मंजूर असलेल्या कामामध्ये बेरडीपार ऐवजी खुर्शीपार असा बदल करण्याबाबत विनंती केली. सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी किन्ही ऐवजी एकोडी असा बदल करण्याची विनंती केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३/३:- जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदीवासी) लेखाशिर्ष २७०२-८५६२ सन २०१७-१८ उपसा सिंचन योजना मौ. डव्वा ता. स/अर्जुनी जि. गोंदिया च्या कामाकरीता मागविण्यात आलेल्या सर्वात कमी दर असलेल्या निविदेस जि.प. सर्वसाधारण सभा स्विकृती/मंजूरी करण्याकरीता विषय ठेवण्याबाबत.**

**ठराव क्र. ३/३ :-** सदर विषयावर साधक-बाधक चर्चा करुन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३/४:- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंगणवाडी बांधकाम, शौचालय बांधकाम व जिर्ण अंगणवाडी दुरुस्तीकरीता मंजूर नियतव्यय नुसार निधीच्या आराखडयास, खर्चास तथा मालमत्ता संपादनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे बाबत.**

**ठराव क्र. ३/४:-** सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री कैलास पटले व सन्मा. सदस्य श्री कुंदन कटारे यांनी कामाची यादी सादर न केल्याचे निदर्शनास आणुन यादी सादर करण्यास सांगितले. यादी सादर न करताच विषयाला मंजूरी देणे योग्य राहणार नाही. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सभापती श्री अरविंद शिवणकर यांनी शासनाचे दिनांक २३ नोव्हेंबर २०१७ चा शासन निर्णयाचा उल्लेख करीत अंगणवाडी बंद करण्याचे धोरण घेतले असल्याचे सभागृहाचा निदर्शनास आणून दिले. सदर महत्वाचा शासन निर्णय बालकल्याण विभागाने सभागृहाचा निदर्शनास आणून देणे गरजेचे होते. परंतू त्यांनी शासन निर्णय सभागृहाच्या निदर्शनास न आणून देता अंगणवाडी बांधकाम मंजूरीचा विषय सभेसमोर ठेवला. दिनांक २३ नोव्हेंबर २०१७ नुसार कोणत्या अंगणवाडी बंद होत आहे याचा शोध घेतल्यानंतर सदर निधीस मंजूरी प्रदान करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी यास समर्थन देत शासन निर्णय वाचन करण्याची विनंती केली. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, ज्या सेविकेचे वय दिनांक ३१ मार्च २०१८ ला ६५ वर्ष पुर्ण होणाऱ्या सेविकांना सेवानिवृत्त करणार

आहेत. सेविकांचे पदे कमी असतांना सेवानिवृत्तीचे वय ६५ वरुन ६० वर्ष करणार असल्यामूळे बरीचशी पदे रिक्त राहतील. जिल्हयात कुपोषणाचे प्रमाण वाढत असतांना सेविकांचे सेवानिवृत्त वय कमी करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले व शासन निर्णयाची प्रत सर्व सन्मा. सदस्यांना देण्याची विनंती केली. तसेच नविन सेविकेची भरती करतांना वयोमर्यादा २१ ते ३० न ठेवता २१ ते ३५ ठेवण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री सुखराम फुंडे यांनी मागील अडीच वर्षापासून अंगणवाडी सेविकांचे विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे सभागृहाचा निदर्शनास आणून दिले. सन्मा. सभापती, तिरोडा यांनी नियमीत CDPO देण्याची मागणी केली. नियमीत CDPO नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांचे वेतनाकरीता आलेले रु. १०.०० लक्ष अतिरीक्त कार्यभार असलेल्या कर्मचारी मुळे परत गेले आहे. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनीही अतिरीक्त कार्यभार असलेल्या CDPO यांचेमुळे रु. १०.०० लक्ष परत गेल्याचे अवगत केले. यावर काय कार्यवाही करणार याबाबत विचारणा केली. सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनीही नियमीत CDPO देण्याची मागणी करुन संबंधीतावर कार्यवाही करण्याची मागणी केली. मागील १३ महिन्यापासून सेविकांचे मानधन मिळालेले नाही.

सविस्तर चर्चेअंती आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंगणवाडी बांधकाम, शौचालय बांधकाम व जिर्ण अंगणवाडी दुरुस्तीकरीता मंजूर नियतव्यय नुसार निधीच्या आराखडयास, खर्चास तथा मालमत्ता संपादनास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३/५:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्र. ७२) यातील तरतुदीबाबत जिल्हा परिषदेचे मत मागविणेबाबत.**

**ठराव क्र. ३/५:-** सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी विशेष सभा बोलाविण्याकरीता पुर्वीप्रमाणेच १/५ सदस्यांची सहमती व विशेष बैठक बोलाविण्याकरीता ३० दिवस ठेवण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनीही १/५ सदस्यांची सहमती व ३० दिवस याप्रमाणेच ठेवण्याचे मत व्यक्त केले. विशेष सभा बोलाविण्याकरीता १/५ सदस्यांची आवश्यकता शासन निर्णयानुसार आहे परंतू आता ती २/५ करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदेचे मत मागीतलेले आहे. परंतू याबाबत पुर्वी प्रमाणेच सदस्यांची आवश्यकता राहणे योग्य राहील असे मत व्यक्त करुन याबाबत कोणतीही सुधारणा करण्यात येवू नये. सदर अट वगळून पुर्ववत १/५ करण्यात यावी. असे सभागृहात एकमताने ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३/६ :- ३०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) ग्रामिण मार्ग विकास व मजबुतीकरण ५०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) इतर जिल्हा मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत सन २०१७-१८ मधील नियोजन.**

**ठराव क्र. ३/६ :-** सदर विषयावर चर्चा करतांना सभागृहात सादर करण्यात आलेली यादी ही चुकीचे नियोजन करुन आराखडा तयार केल्यामुळे यात सुधारणा करुन पुन्हा मंजूरीकरीता ठेवणे आवश्यक

असल्याचे सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी सांगितले. स्थायी समितीने ठरविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी. माझे क्षेत्रातील एकही काम घेतलेले नाही. सुकळी, बेरडीपार टोला, खुर्शीपार व अशा अनेक ठिकाणी येथे रस्त्यांची आवश्यकता असतांनाही रस्त्यांचे कामे नियोजनात समाविष्ट केलेले नसल्यामुळे अत्यंत नाराजी व्यक्त करुन आराखडयात सुधारणा करुन पुन्हा मंजूरीकरीता ठेवण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्या श्रीमती दसरे यांनीही सदर आराखडयास विरोध दर्शविला. खराब झालेल्या रस्त्यांचे नांव आराखडयात आलेले नाही. खातीटोला-गंगाझरी रस्त्याचे भूमिपूजन झाले असून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आणले. रु. ४०.०० लक्ष आणि रु. ११.०० लक्ष सदर रस्त्याकरीता निधी मंजूर आहे. याबाबत लिखीत तक्रार केलेली आहे. परंतू कार्यवाही झालेली नाही. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी जिल्हा परिषद क्षेत्रातील कामाचे भुमिपूजन करतांना स्थानिक सदस्यांचे नांव कार्यक्रम पत्रिकेत टाकणे आवश्यक आहे. राजशिष्टाचार पाळणे आवश्यक असल्याचे सांगितले. सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी सदर रस्त्याचे बांधकाम ज्या कंपनीला दिलेले आहे, त्या कंपनीचे नांव काळया यादीत आहे काय? याबाबत विचारणा केली. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, सदर कंपनी काळया यादीत आहे काय याबाबत तपासणी करण्यात येईल व सदर रस्त्याचे quality control कडून तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी सन्मा. सदस्य यांना सोबत घेऊन चौकशी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. बांधकाम समितीने मंजूर केलेल्या यादीस कोणत्या नियमाने मंजूरी द्यावी. स्थायी समितीने मंजूर केलेली यादी ठेवणे क्रमप्राप्त आहे. वस्तुस्थितीशी निगडीत प्राध्यान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे. बरेचशे खराब रस्त्यांचे नांव आराखडयात समाविष्ट नाही. स्थायी समितीने मंजूर केलेली यादी मंजूर करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्या श्रीमती दुर्गाताई तिराले यांनीही सभागृहात सादर करण्यात आलेल्या यादीस विरोध दर्शविला. सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी अवगत केले की, काही क्षेत्रात ३ ते ४ कामे घेतलेली असतांना काही क्षेत्रात एकही काम घेतलेले नाही. यांनीही सदर यादीस विरोध दर्शविला. सन्मा. सदस्य श्री रमेश अंबुले यांनी ज्या गावांत आजपर्यंत रस्ता तयार झालेला नाही तेथील रस्ता प्राधान्य क्रमांक १ वर असणे आवश्यक असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्या श्रीमती तेजुकला गहाणे यांनी त्यांचे क्षेत्रातील ३८ गावांपैकी एकाही गावांत काम नसल्याचे सभागृहाला अवगत केले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी बांधकाम समितीमध्ये मंजूर झालेल्या यादीस बदलविण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे काय? अशी विचारणा केली. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, बांधकाम समितीने मंजूर केलेल्या यादीस स्थायी समितीने दुरुस्ती सुचविली होती. म्हसवानी-डव्वा ऐवजी परसोडी-डोंगरगांव घेण्याकरीता स्थायी समिती सभेत दुरुस्ती सुचविली होती. परंतू PCI मध्ये बांधकाम व स्थायी समितीमध्ये नाही असे नमूद आहे. परंतू दिनांक २९.१२.२०१७ च्या स्थायी समितीमध्ये विषय क्रमांक ३/५ मध्ये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी बांधकाम समिती व स्थायी समिती मध्ये मंजूर केले असल्यामूळे सदर यादीस मंजूरी देण्यास हरकत नसल्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री रचना गहाणे यांनी विषय समितीचे अधिकार असतांना स्थायी समितीने दुरुस्ती करुन विषय समितीच्या अधिकारावर गदा आणण्याचे अधिकार आहेत काय? याबाबत विचारणा केली. यावर अति. मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, आराखडा मंजूरीचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. बांधकाम समिती व स्थायी समितीने सुचविलेले रस्त्याचा व शासन निकषाचा विचार करुन सुधारीत आराखडा तयार करण्यात आलेला आहे या आराखडयातील यादीला आजच्या सभेत मंजूरी न दिल्यास निधी दुसरीकडे वळती होऊ शकतो. करीता निधी मिळण्याकरीता आराखडयाला मंजूरी देण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्या श्रीमती छायाताई दसरे यांनी ज्या गावांत रस्त्यांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी प्राधान्याने रस्ते मंजूर करण्याकरीता सुचविले. सन्मा. सदस्या श्रीमती ऊषाताई मेंढे यांनी अवगत केले की, आवश्यक त्या ठिकाणीच कामे मंजूर करण्यात यावी. स्थायी समितीला महत्व नसेल तर सदर विषय स्थायी समितीमध्ये आणून सभेची अवमानना करण्यासारखे आहे. चर्चेअंती मा. अध्यक्ष महोदया यांनी सर्व सदस्यांनी आपल्या क्षेत्रातील नांवे १ दिवसांचे आत सादर करुन सदर नांवे आराखडयात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. सदर आराखडयास सुधारणेसह मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सुधारणेसह मंजूर.**

**सभेत झालेली अतिरीक्त चर्चा**

१) सन्मा. सदस्य श्रीमती सुनिता मडावी यांनी किशोरीयन मुलींचे पोषण आहार शिजविणाऱ्या महिलांचे मानधन मिळाले नसल्याचे सभागृहास अवगत केले. तसेच तिरोडा पंचायत समिती अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांचेही मानधन मिळाले नसल्याचे सांगितले.

२) सन्मा. सदस्य श्रीमती सुनिता मडावी यांनी पशु वैद्यकिय दवाखाना वडेगांव येथे पशुवैद्यकिय अधिकारी देण्याची मागणी केली.

३) सन्मा. सदस्य श्रीमती ललिता चौरागडे यांनी हिरापुर ते संभाटोली येथे पाईप लाईन वाढवुन टंकी लावण्यात यावे ३०० लोकसंख्या आहे आणी पाणी टंचाई असल्यामुळे त्वरीत उपाययोजना करण्याची मागणी केली. तसेच तिमेझरी येथील नळ योजना बंद आहे त्यांना पुर्ववत सुरु करण्याची मागणी केली.

४) सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनी ग्रामपंचायत वडेगांव ता.तिरोडा येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी परस्पर रक्कम खर्च करुन अनियमितता व नियमबाहयता केली असल्याचे गट विकास अधिकारी तिरोडा यांचे चौकशी अहवालावरुन दिसुन येत आहे. तरी संबधित दोषी ग्रामसेवकांवर कारवाई करण्याची मागणी केली.

५) सन्मा. सभापती, पं.स. तिरोडा यांनी पंचायत समिती तिरोडा येथील सभापती कक्षाची व आंतरीक खोलीची डागडुजी व नुतनीकरण करण्याची मागणी केली.

६) सन्मा. सभापती, पं.स. तिरोडा यांनी अंगणवाडी तपासणी व प्रकल्पाच्या इतर कामाकरिता प्रकल्पस्तरावर जिल्हा परिषद मार्फत भाडयाने वाहन उपलब्ध करुन देण्यात आले होते. परंतु मागील ६ ते ७ महिण्यापूर्वी सदर वाहन बंद करण्यात आलेले आहे त्यामुळे बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच आवश्यकता भासल्यास अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना प्रकल्पाशी संदर्भात

अंगणवाडी केंद्रास वेळेवर भेट देता येत नाही त्यामुळे प्रकल्पाशी निगडीत कामावर विपरीत परिणाम होत आहे. करिता प्रकल्पाच्या कामाकरिता एकात्मीक बाल विकास प्रकल्पास वाहन उपलब्ध करुन देण्याची मागणी केली.

७) सन्मा. सभापती, पं.स. तिरोडा यांनी प्रकल्प तिरोडा येथील बालविकास प्रकल्प अधिकारी चे पद बरेच दिवसांपासुन रिक्त असल्याने सदर पदाचा कार्यभार सध्या बाल विकास प्रकल्प अधिकारी, प्रकल्प आमगांव यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. पंरतु त्यांचेकडे दोन प्रकल्पाचा कार्यभार असल्यामुळे त्यांना फारसा वेळ देत येत नसल्याने येथील कामकाजावर विपरीत परिणाम होत असुन कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व कार्यालयीन कामकाज मुदतीत पूर्ण करणे शक्य होत नाही. तरी प्रकल्प तिरोडा येथील बालविकास प्रकल्प अधिकारी चा कार्यभार श्री.जे.एल.जिभकाटे, अधिक्षक, शालेय पोषण आहार, पं.स. तिरोडा यांना सोपविण्याची विनंती केली.

८) सन्मा. सभापती, पं.स. तिरोडा यांनी पंचायत समितीतील कार्यरत वाहन चालक सेवानिवृत्त झाल्यामुळे पद रिक्त झालेले असुन तिथे वाहन चालक देण्यात यावा अथवा सेवा तत्वावर वाहन चालक घेण्याची परवानगी देण्याची विंनती केली.

९) सन्मा. सदस्या श्रीमती विणा बिसेन यांनी श्री. पी.एम.ठवकर, कनिष्ठ सहाय्यक, प्रा. आ. केंद्र, मुल्ला, पं.स. देवरी यांना दिनांक ३०.०४.२०१३ ला सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. पण त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे लाभ अजुनही अदा करण्यात आलेले नसल्याचे सभागृहास अवगत केले. तसेच त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ त्वरीत प्रदान करण्याची मागणी केली.

**<u>विषय क्रं.४ :</u>-जि.प. सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**<u>ठराव क्र.४: -</u> जि. प. सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

हयानंतर सभेसमोर चर्चेला इतर विषय नसल्याने सर्व उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

स्वा/-
सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया.

स्वा/-
अध्यक्ष,
जिल्हा परिषद, गोंदिया

# जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १३.०३.२०१८

## कार्यवृत्त भाग - २

| दिनांक व वेळ | उपस्थित पदधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक १३.०३.२०१८<br>वेळ दुपारी १.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**विषय क्र. १ :- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्र. १ :-** सविस्तर चर्चा करुन जि.प. सर्वसाधारण सभा दिनांक १५.१२.२०१७ व जि.प. विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २३.०२.२०१८ च्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. २ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्रमांक २:-** वित्त विभागाशी संबधित शासकीय परिपत्रकाचे वाचन करण्यात आले. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी दिनांक १ मार्च २०१८ चा शासन निर्णय रद्द करण्याचा ठराव घेऊन शासनास सादर करण्याचे मत व्यक्त केले. सदर शासन निर्णयामुळे प्रस्तावाला वेळीच मान्यता मिळणार नाही व त्यामुळे निधी खर्च होण्यास अडचण निर्माण होईल. सदर शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषदेच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न होत आहे. करीता सदर शासन निर्णय रद्द करुन पुर्वीप्रमाणेच अधिकार बहाल करण्याचे मत व्यक्त केले. यास सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी दुजोरा दिला. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी वरील प्रस्तावाला सहमती दर्शविली.

जिल्हा परिषद सर्व साधारण समिती सभा दिनांक १३ मार्च २०१८ विषय क्र २ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक- झेडपीए- २०१६/प्र.क्र. ५६/ वित्त ९ मंत्रालय मुंबई दिनांक ०१.०३.२०१८ चे सभेत वाचन करतांना सन्मा. जिल्हा परिषद सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी मत व्यक्त केले की सदर्हु शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषदेस शासनाकडून प्राप्त विकास योजनांच्या निधी संदर्भात राज्यस्तरीय आयुक्त, संचालक यांची तांत्रिक मान्यता घेण्यासंदर्भात नमुद केले आहे व ज्या प्रशासकिय विभागाच्या अधीपत्याखाली राज्यस्तरीय आयुक्त/ राज्यस्तरीय संचालक ही पदे कार्यरत नसतील तेथे संबधित प्रशासकीय विभागाची मान्यता घेण्यासंदर्भात नमुद केले आहे. त्यामुळे विकास योजना राबविण्याचे अनुषगांने जिल्हा परिषदेस अडथळा निर्माण होणार आहे यास्तव जिल्हा परिषदेस यापुर्वी शासनाने शासन निर्णय क्रमांक ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त ९ मंत्रालय मुंबई दिनांक १९.०३.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेस यापुर्वी विकास श्यांजनांची रुपये ५० लक्ष पर्यंतचे तांत्रिक मान्यतेचे अधिकार असणे आवश्यक आहे त्यामुळे उपरोक्त नमुद केलेल्या दिनांक १९/०३/२०१२ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेस असलेले तांत्रिक मान्यतेचे अधिकार पुर्ववत लागु करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक

आहे असे मत नोंदविले. सदर्हु मतास जिल्हा परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली त्यामुळे मा. अध्यक्षा जिल्हा परिषद यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी शासनाकडे सदर प्रकरणी प्रस्ताव सादर करण्यासाठीचा ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ३</u> :- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**<u>विषय क्र. ३/१</u> :- वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३४७, एम.एच.३५ डी-३४८, एम.एच.३५ डी-३५०, एम.एच.३५ डी-७९९, एम.एच.३५ डी-१९९, एम.एच.३५ डी-३४९ व एम.एच.३५ ए-९९०५ या एकूण ७ वाहनास निर्लेखीत करण्यास व त्या वाहना ऐवजी एकूण ६ नविन वाहन खरेदी करण्याची मंजूरी मिळण्याबाबत.**

**<u>ठराव क्र. ३/१</u> :-** जिल्हा परिषद, गोंदिया सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत मा. सभापती, समाजकल्याण समिती, जि.प. गोंदिया यांचे अधिनस्त वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३४७ (टाटा मांझा), मा. सभापती आरोग्य, शिक्षण व क्रिडा समिती, जि.प. गोंदिया यांचे अधि. वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३४८ (टाटा मांझा), मा. सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जि.प. गोंदिया यांचे अधि. वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३५० (टाटा मांझा), मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया यांचे अधि. वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-७९९ (टाटा इंडिगो), गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आमगांव यांचे अधि.वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-१९९ (टाटा सुमो), वाहन क्रमांक एम.एच.३५ ए-९९०५ (जिप) व मा. सभापती, महिला व बालकल्याण समिती, जि.प. गोंदिया यांचे अधि.वाहन क्रमांक एम.एच.३५ डी-३४९(टाटा मांझा) या एकुण ७ वाहनास निर्लेखीत करण्यासाठी व त्या वाहनाऐवजी एकूण ६ नविन वाहन जि.प. च्या घसारा निधीतून खरेदी करण्यास व येणाऱ्या खरेदी खर्च अंदाजित रु. ३८.०० लक्ष खर्चास तसेच सदर वाहन लिलावाद्वारे विक्री करण्याकरीता आजची जि.प. सर्वसाधारण सभा सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर, सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांचेसह इतर २० सन्मा. सदस्यांचा विरोध नोंदऊन बहुमताने मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव बहुमताने मंजूर.**

**<u>विषय क्र. ३/२</u> :- जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ या वर्षातील प्राथमिक शाळा इमारत बांधकामासाठी जि.प.ला अनुदान (३४५१२६९३) या लेखाशिर्षका अंतर्गत मंजूर वर्गखोली बांधकामाच्या नावांत बदल करण्याबाबत.**

**<u>ठराव क्र. ३/२</u> :-** जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ या वर्षातील शाळा बांधकामासाठी जि.प. ला अनुदान (३४५१ २६९३) या लेखा शिर्षका अंतर्गत रु. २००.०० लक्ष अनुदान मंजूर असून जिल्हा परिषद शिक्षण व क्रीडा समिती सभा दिनांक १५.७.२०१७ व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ८.११.२०१७ ला शाळा इमारत बांधकामाला नावानिशी मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. यामध्ये मा. जि.प. सदस्य यांनी खालील प्रमाणे नावांमध्ये बदल करण्याचे सुचविले.

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | प्रस्तावित मंजूर नांव | बदल करावयाचे नांव | सूचक |
|---|---|---|---|---|
| १ | गोरेगांव | जि.प. प्राथ.शाळा देऊटोला येथे एक वर्गखोली बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | जि.प. प्राथ. शाळा सर्वाटोला येथे एक वर्गखोली बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | मा. जि.प. सदस्य तथा माजी सभापती शिक्षण व क्रिडा समिती श्री पी.जी. कटरे |
| २ | गोंदिया | जि.प. उच्च प्राथ. शाळा दासगांव (बु) येथे एक वर्गखोलीचे बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | जि.प. उच्च प्राथ. शाळा दासगांव (खु) येथे एक वर्गखोलीचे बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | मा. जि.प. सदस्या सौ. रजनी गौतम |

सदर विषयावर दिनांक १०.११.२०१७ च्या शिक्षण व क्रिडा समिती विषय क्रमांक ३/१६ नुसार मंजूरी प्रदान करण्यात आली असून दिनांक १३.३.२०१८ च्या जिल्हा परिषद सर्वसाधारण समिती सभेमध्ये मंजूरी प्रदान करण्यात आली.

तसेच सदर विषयावर चर्चा सुरु असतांना मा. जि.प.सदस्या श्रीमती रजनी कुभंरे यांनी जि.प. प्राथमिक शाळा बेरडीपार (खुर्शीपार) पं.स. तिरोडा अंतर्गत मंजुर वर्गखोलीचे (रुपये ७.२० लक्ष) नावाऐवजी जि.प. प्राथमिक शाळा खुर्शीपार (बेरडीपार) या प्रमाणे बदल करण्याचे सुचविले तसेच सन्मा. सभापती महोदय यांनी जि.प. प्राथमिक शाळा, मुंडीपार, ता. गोंदिया येथील १ वर्गखोली दुरुस्ती (रुपये १.०० लक्ष) चे काम मुंडीपार (आसोली) असल्याचे सूचविण्यात आले.

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | प्रस्तावित मंजूर नांव | बदल करावयाचे नांव | सूचक |
|---|---|---|---|---|
| १ | तिरोडा | जि.प. प्राथ.शाळा बेरडीपार (खुर्शीपार) येथे एक वर्गखोली बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | जि.प. प्राथ.शाळा खुर्शीपार (बेरडीपार) येथे एक वर्गखोली बांधकाम (रु. ७.२० लक्ष) | सना सदस्या श्रीमती रजनी कुभंरे |
| २ | गोंदिया | जि.प. उच्च प्राथ. शाळा मुंडीपार येथे वर्गखोली दुरुस्ती करणे (रु. १.०० लक्ष) | जि.प. उच्च प्राथ. शाळा मुंडीपार (आसोली) येथे एक वर्गखोलीचे बांधकाम (रु. १.०० लक्ष) | मा. सभापती शिक्षण , क्रिडा व आरोग्य समिती |

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ३/३</u>:- जिल्हा वार्षीक योजना (बिगर आदिवासी) लेखाशिर्ष २७०२-८५६२ सन २०१७-१८ उपसा सिंचन योजना मौ. डव्वा ता. स./अर्जुनी जि. गोंदिया च्या कामाकरिता मागविण्यात आलेल्या सर्वात कमी दर असलेल्या निविदेस जि.प. सर्वसाधारण सभा स्विकृती/मंजूरी प्रदान करण्याकरीता विषय ठेवण्याबाबत.**

**<u>ठराव क्र.३/३</u>** :-जिल्हा वार्षीक योजना (बिगर आदिवासी) सन २०१७-१८ उपसा सिंचन योजना मौ. डव्वा ता. स./अर्जुनी उपसा सिंचन योजना मौ. डव्वा च्या कामास मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. गोंदिया जा.क्र./गोंजिप/लपावि/तांशा-२/०६-०१/२०१७, दि. १८.११.२०१७ ला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच तांत्रीक मान्यता ०६-२१/२०१७ दि. १६.१२.२०१७ ला तांत्रीक मंजूरी दिलेली आहे. सदर कामाची ई-निविदा दिनांक ०६.०२.२०१८ ला प्रसिध्द करण्यात आली होती. व दिनांक ०३.०३.२०१८ ला निविदा उघडण्यात आली व खालीलप्रमाणे कंत्राटदाराने आपले दर नोंदविलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व तालुका | कामाची अंदाजीत किंमत | सर्वात कमी दर असलेले कंत्राटदाराचे नाव | सर्वात कमी दर असलेल्या निविदाची रक्कम | सर्वात कमी दर असलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपसा सिंचना योजना मौजा डव्वा ता. सडक/अर्जुनी | ५५,६२,१७७/- | श्री. साधुराम कंन्स्ट्रक्सन | ५१,१७,२०२ | -८.०० |
| २ | | | श्री. ताजेन्द्र क. छाबडा | ५३,४२,४७१ | -३.९५ |
| ३ | | | मे. उमा कंन्स्ट्रक्सन, प्रो. सी.के. बिसेन, देवरी | ४९,४७,००० | -११.०६ |

वरील प्रमाणे सर्वात कमी दर नोंदविलेले अ.क्र. ३ चे कंत्राटदार मे. उमा कंन्स्ट्रक्सन प्रो. सी.के. बिसेन, देवरी यांनी -११.०६ कमी दर नोंदविलेले असल्यामुळे सदर कामाची निविदा ५०.०० लक्षापेक्षा जास्त असल्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ मंत्रालय मुंबई-३२ दि. ०७ ऑक्टोंबर २०१७ भाग-५ अ.क्र.८ अन्वये निविदा व कंत्राट स्विकारण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला असल्यामुळे सदर विषय जि.प. च्या सर्वसाधारण सभेत ठेवण्याकरिता स्थायी समिती सभा दि. ०९.०३.२०१८ विषय क्र. ७/२ मंजूर करण्यात आली असुन जि.प. सर्वसाधरण सभेच्या मंजूरीकरिता केलेल्या शिफारसीनुसार आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सर्वात कमी दराची निविदा मे. उमा कंन्स्ट्र. देवरी निविदेची रक्कम ४९,४७,०००/- यास सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**<u>विषय क्र. ३/४</u> :- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंगणवाडी बांधकाम, शौचालय बांधकाम व जिर्ण अंगणवाडी दुरुस्तीकरीता मंजूर नियतव्यय नुसार निधीच्या आराखडयास, खर्चास तथा मालमत्ता संपादनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे बाबत.**

**<u>ठराव क्र. ३/४</u> :-** मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती गोंदिया यांचे पत्र क्र.अशा./जिवायो/१७-१८/निमाप्र/७७/दिनांक २४ जानेवारी २०१८ अन्वये तसेच मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग नवी मुंबई यांचे पत्र क्र एबाविं-२०१८/प्र.क्र.९६/का.६ दिनांक १ मार्च २०१८ अन्वये अंगणवाडी बांधकाम, शौचालय बांधकाम व जिर्ण अंगणवाडी दुरुस्ती करिता रु. १६०.०० लक्ष नियत व्यय मंजुर करण्यात आले असून त्याचे दिड पट नियोजन करण्यात आली असुन त्याला महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १५/०२/२०१८ तसेच स्थायी समिती सभा दिनांक ९/०३/२०१८ चे ठराव क्रमांक ० अन्वये सदर नियतव्ययाच्या निधीच्या खर्चास व आराखडयास मंजुरी प्रदान करण्यात आली असून जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरिता शिफारस करण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | **विकास/शिर्ष योजनेचे नांव** | **सन २०१७-१८ या वर्षाकरीता मंजूर नियतव्यय** |
|---|---|---|
| १ | अंगणवाडी बांधकाम | १२०.०० |
| २ | शौचालय बांधकाम | ६०.०० |
| ३ | जिर्ण अंगणवाडी दुरुस्ती | ६०.०० |
| | **एकूण** | **२४०.००** |

जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरिता केलेल्या शिफारसीनुसार आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंगणवाडी बांधकाम, शौचालय बांधकाम व जिर्ण अंगणवाडी दुरुस्तीकरीता मंजूर नियतव्यय नुसार निधीच्या आराखडयास, खर्चास तथा मालमत्ता संपादनास खालीप्रमाणे सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्र. ३/५</u>:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्र. ७२) यातील तरतुदीबाबत जिल्हा परिषदेचे मत मागविणेबाबत.**

**संदर्भ- ध. जि. जाधव, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. झेडपीए-२०१७/प्र.क्र.१३४/पंरा-१, दिनांक १६ जानेवारी, २०१८**

**<u>ठराव क्र ३/५:-</u>** उपरोक्त विषयान्वये महा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ मधील प्रकरण ७ कलम १११ यात जिल्हा परिषदांच्या सभांची तरतूद नमुद करण्यांत आलेली आहे. या कलमाच्या पोट कलम ३ मध्ये कमीत कमी एक पंचमांश सदस्यांनी मागणी केली असता अध्यक्षांना विशेष सभा बोलविण्यांचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत.

उपरोक्त विधेयकाद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदीत खालील प्रमाणे सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १११ मधील, पो-कलम (३) मध्ये,-(क) "एक पंचामांशापेक्षा" या मजकुराऐवजी, "दोन पंचामाशापेक्षा" हा मजकुर दाखल करण्यात येईल;
(३) विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु जिल्हा परिषदेच्या मागील शेवटच्या बैठकीच्या दिनांकापासून साठ दिवसाच्या आत विशेष बैठक बोलावण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, अध्यक्षाकडे जिल्हा परिषदेच्या मागील शेवटच्या बैठकीच्या दिनांकापासून साठ दिवसाच्या आत विशेष बैठक बोलावण्यासाठी विनंती प्राप्त झाली असेल तेव्हा, अध्यक्षास एकतर साठ दिवसांच्या आत ती विशेष बैठक बोलावता येईल किंवा त्याबददलची कारणे नोंदवून ती विनंती फेटाळता येईल :

परंतु तसेच, विशेष बैठक बोलावण्यात येईल तेव्हा बैठकीच्या नोटीशात, ज्या दिनांकास बैठक घ्यावयाची असेल तो दिनांक नमूद करील, असा दिनांक हा नोटीस काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या नंतरचा असणार नाही."

महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी सदरचे विधेयक मान्यतेसाठी सादर केले असता, त्यावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विधेयकातील वरील तरतूदीबाबत जिल्हा परिषदांचे मत मागविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १३.०३.२०१८ रोजीच्या सभेमध्ये प्रस्तावित असलेल्या विधेयकातील वर नमूद सुधारणांबाबत चर्चा करण्यात आली. सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी विशेष सभा बोलाविण्याकरीता पुर्वीप्रमाणेच १/५ सदस्यांची सहमती व विशेष बैठक बोलाविण्याकरीता ३० दिवसच ठेवण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनीही १/५ सदस्यांची सहमती व ३० दिवस याप्रमाणेच ठेवण्याचे मत व्यक्त केले. विशेष सभा बोलाविण्याकरीता १/५ सदस्यांची आवश्यकता शासन निर्णयानुसार आहे परंतू आता ती २/५ करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदेचे मत मागीतलेले आहे. परंतू याबाबत पुर्वी प्रमाणेच सदस्यांची आवश्यकता राहणे योग्य राहील असे मत व्यक्त करुन याबाबत कोणतीही सुधारणा करण्यांत येवू नये. सदर २/५ ची अट वगळून पुर्ववत १/५ करण्यात यावी. असे सभागृहात एकमताने ठरविले.

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेनी दिलेले सदर मत हे शासनास पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**<u>विषय क्र. ३/६</u>:- ३०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) ग्रामिण मार्ग विकास व मजबुतीकरण ५०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) इतर जिल्हा मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत सन २०१७-१८ मधील नियोजन.**

**<u>ठराव क्र.३/६</u> :-** वरील विषयाच्या अनुषंगाने लेखाशिर्ष जिल्हा वार्षिक योजना ३०५४ व ५०५४ रस्ता मजबुतीकरणाच्या कामाबाबतचे दिनांक-०३/०९/२०१६ चे शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग यांच्या करीता तालुका स्तरावर PCI (Pavement Condition Index) (पी.सी.आय.)(पृष्ठभाग स्थितीदर्शक निर्देशांक) आधारे प्राधण्यक्रम गुणांकन सहीत याद्या करण्यात याव्यात व सदर प्राधान्यक्रम यादीला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने अंतिम करण्यात यावी. तसेच उपलब्ध होणाऱ्या नियत्वयाप्रमाणे सन २००१-२०२१ चे रस्ते विकास आराखडया प्रमाणे तालुक्याच्या भौगोलीक क्षेत्रफळानुसार जो निधी उपलब्ध असेल, त्या अनुषंगाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत मंजुर /प्रस्तावित रस्ते वगळुन उर्वरीत रस्त्यापैकी प्राधण्यक्रम यादी नुसार/ गुणांकनानुसार पात्र रस्ते निश्चित करण्याच्या सुचना आहेत.व उपरोक्त पध्दतीचे अवलंबन केल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची खात्री झाल्यानंतरच जिल्हा नियोजन समितीस अंतिम प्रस्ताव सादर करणे आहे. त्यामध्ये रस्त्याचे फक्त खडीकरण घेण्यात येणार नाही याची दक्षता घेण्याचे व पुलाची कामे जोडरस्तासह घेण्याचे बंधनकारक असल्याचे निर्देश आहेत. तसेच, प्रस्ताव तयार करतांनी रस्त्याची किमान १.०० कि.मी. लांबी प्रस्तावित असावी. सदर लांबी पुढिल ४ वर्षापर्यंत प्रस्तावित करता येणार नाही.

०३ सप्टेंबर २०१६ चे शासन परिपत्रकातील दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलंब करून मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत मंजुर /प्रस्तावित रस्ते वगळुन तालुका निहाय दिनांक ११ डिसेंबर २०१५ च्या शासन परिपत्रकातील नमुद मार्गदर्शक सुचनांचे अवलंब करून इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग रस्त्यांची वेगवेगळी तालुकानिहाय PCI/गुणांकन यादी तयार करण्यात आलेली आहे व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे मान्यतेने अंतिम केली आहे.

३०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) ग्रामिण मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत सन २०१७-१८ करीता रू.५०९.९८ लक्षाचे नियत्वय मंजुर असुन सन २०१६-१७ चे दायीत्व २१६.१८ लक्ष आहे.रू.५०९.९८ लक्ष मंजुर नियत्वय मधुन दायीत्व वजा जाता रू.२९३.२२ लक्ष नियोजनाकरीता उपलब्ध आहेत. त्यानुसार शासनाचे प्रचलित परिपत्रकानुसार रू. २९३.२२ लक्षाचे दिडपट रू.४३९.८३ लक्षाचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

तसेच ५०५४ जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) इतर जिल्हा मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत सन २०१७-१८ करीता रू. १०८.२७ लक्षाचे नियत्वय मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती गोंदिया यांच्या दिनांक १४/०२/२०१८ च्या पत्रान्वये उपलब्ध करून दिलेले आहे. त्यानुसार उपलब्ध नियत्वयाचे च्या दिडपट रू. १६२.४० लक्षाचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने दिनांक २७/१०/२०१७ चे बांधकाम समितीमध्ये अति. ठराव क्रं. ६/२ अन्वये ३०५४ ग्रामिण मार्ग चे ४४०.८६ लक्षाचे एकुण ३६ कामांना व ५०५४ जिल्हा वार्षिक योजना इतर जिल्हा मार्ग चे सन-२०१७-१८ चे ७००.०० लक्ष चे नियतव्य अपेक्षित समजुन रू ७८८.२७ चे २७ कामांच्या यादीला बांधकाम समितीने मान्यता दिलेली होती. सदर बांधकाम समितीच्या यादीमध्ये ३ सप्टेंबर २०१६ चे शासन निर्णयात दिलेले मार्गदर्शक सुचनांचे काही प्रमाणात अवलंबन करण्यात आलेले आहे.

सदरहु बांधकाम समितीने मान्यता दिलेली यादी दिनांक ४/१२/२०१७ चे स्थायी समितीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्यात आली. स्थायी समिती सभेमध्ये सदस्यांनी सुचविलेली कामे समाविष्ठ करून सुधारीत यादी सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावी असे सभाध्यक्षानी सुचीत केले. व दिनांक २९/१२/२०१७ चे स्थायी समितीने ३०५४ ग्रामिण मार्ग अंतर्गत २४ कामे ५०५४ इतर जिल्हा मार्ग अतंर्गत २७ कामांच्या सुधारीत यादीला मान्यता दिली. सदर यादीमध्ये बांधकाम समितीतील ३०५४ अतंर्गत ११ कामांचा व ५०५४ अतंर्गत २१ कामांचा समावेश आहे.

सदर ३०५४ ग्रामिण मार्ग व ५०५४ इतर जिल्हा मार्ग जिवायो सर्वसाधारण योजनेच्या स्थायी समितीने मान्यता दिलेल्या यादीमध्ये ३ सप्टेंबर २०१६ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे अंशतः अवलंबन करण्यात आले आहे.

वरील बांधकाम व स्थायी समितीच्या प्रसतावित यादया मध्ये ३ सप्टेंबर २०१६ च्या परिपत्रकातील दिलेले मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे /पुर्णतः अवलंबन न झाल्यामुळे सदरहु शासन निर्णय निकषाप्रमाणे PCI/गुणाकंन प्राधान्यक्रम यादीनुसार ३०५४ ग्रामिण मार्ग जिवायो चे ४३९.८३ लक्षाचे २० कामांची व ५०५४ इतर जिल्हा मार्ग जिवायो (सर्वसाधारण) चे रू.१६२.४० लक्षाचे ९ कामांची तालुका निहाय २००१-२०२१ चे रस्ते विकास आराखडयातील भौगोलीक क्षेत्रफळाप्रमाणे तसेच तालुका निहाय उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार आराखडा तयार करण्यात आलेले आहे.

बांधकाम समितीने मान्यता दिलेले प्रस्ताव व स्थायी समितीने मान्यता दिलेले प्रस्ताव ३ सप्टेंबर २०१६ चे शासन निर्णयानुसार विभागाने तयार केलेला आराखडयास आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेनी भाग क्र १ मध्ये सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सुधारणेसह मंजुर.**

**विषय क्रं.४:-जि.प. सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र.४: - जि. प. सर्वसाधारण सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.**

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सचिव | अध्यक्ष, |
| सर्वसाधारण सभा तथा | जिल्हा परिषद, गोंदिया |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) | |
| जिल्हा परिषद, गोंदिया. | |

# <u>जिल्हा परिषद विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०३.२०१८</u>

## <u>कार्यवृत्त भाग - १</u>

| दिनांक व वेळ | उपस्थित पदधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक १६.०३.२०१८ वेळ दुपारी ११.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०३.२०१८ ला सकाळी ११.०० वा. मा. श्रीमती सिमा मडावी अध्यक्षा, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सभेला विषय समितीचे सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) तथा सचिव सर्वसाधारण सभा, जिल्हा परिषद व इतर खात्याचे विभागप्रमुख, खंड विकास अधिकारी, उपविभागीय अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

**<u>विषय क्र. १</u>:- जि.प. गोंदियाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकाला मंजूरी प्रदान करणे.**

**<u>ठराव क्र. १</u>:-** जि.प. गोंदियाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकावर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली.

सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा दुपारी १.२० वा. सुरु झाल्यामूळे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर, सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे व सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी नाराजी व्यक्त करुन सभेत सादर करण्यात येत असलेल्या सुधारीत अंदाजपत्रक व संभाव्य अंदाजपत्रकाची पाहणी न केल्यामूळे आताच अंदाजपत्रकाला मंजूरी देता येणे शक्य नसल्याचे सांगून आजच्या सभेत त्रुटी नोंदऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे सांगितले.

विशेष सर्वसाधारण सभा नियोजित वेळेपेक्षा उशिराने सुरु झाल्यामूळे सन्मा. उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती श्री हमीद अल्ताफ अकबरअली यांनी दिलगीरी व्यक्त करुन सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रक सभागृहात सादर केले.

दुकानगाळे बांधकामावर रु. १.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. मागील अर्थसंकल्पातही रु. १.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली होती. मागील वर्षीचा निधी खर्च करण्यात आलेला आहे काय? याबाबत माहिती सादर करण्यास सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या ठिकाणी दुकानगाळे बांधकाम करुन त्यातून उत्पन्न वाढविणे हा मुख्य हेतू आहे. कार्यकारी अभियंता, सा.बा. सभेत उपस्थित नसल्यामूळे नाराजी व्यक्त केली. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी मागील वर्षीची शिल्लक रु. ९.०० कोटी असल्याचे अवगत केले. एकुण अंदाजपत्रकापैकी रु. ७.०० कोटी फक्त बांधकाम विभागाला देण्यात आलेले आहे. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत पाणीपुरवठा विभागाला निधी वाढवुन देण्याची चर्चा झालेली होती. पाणीपुरवठा विभागाला निधी वाढवुन देणे अपेक्षीत होते. परंतू चर्चेप्रमाणे

कार्यवाही करण्यात आलेली नाही. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी अवगत केले की, दुकानगाळे बांधकामावरील मंजूर निधीपैकी रु. १.०० कोटी का खर्च झाले नाही? याची कारणे माहिती नसणे ही शोकांतीका आहे. माझ्या माहितीप्रमाणे निधी पुर्ण खर्च झालेला आहे. तसेच सारस पक्ष्याने आपल्या गोंदिया जिल्हयाला देशात ओळख निर्माण करुन दिलेली आहे. त्या सारस पक्षीचे छायाचित्र अंदाजपत्रक पुस्तिकेमधून काढणे ही खेदाची बाब आहे. सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी यास समर्थन दर्शवूनअधिकारी परिपूर्ण माहितीसह सभेला उपस्थित न राहणे व सारस पक्षीचे छायाचित्र वगळणे हे फार खेदाची बाब असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी अवगत केले की, ज्या ठिकाणी उत्पन्न जास्त आहे त्याच ठिकाणी दुकानगाळे बांधणे फायदेशीर आहे. जिल्हा परिषदेच्या जागेवर दुकानगाळे बांधकाम करुन जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविता येते.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, मा. अध्यक्ष, सन्मा. उपाध्यक्ष व सन्मा. सभापती यांचे कक्षाचे सौदर्यीकरणावर अनेकवेळा खर्च केलेला आहे. याही वर्षी तब्बल रु. १.२० कोटी खर्चाची तरतुद केलेली आहे. सदर सौदर्यीकरणावर प्रत्येक वर्षी खर्च करण्यात येत असल्यामूळे यावर्षी सदर कामावर खर्च न करता जिल्हयात पाणीटंचाई असल्यामूळे सदर खर्च पाणीपुरवठा विभागावर (पाणी टंचाई) खर्च करण्यास सुचविले.

सन्मा. सभापती श्री अरविंद शिवणकर यांनी अवगत केले की, सत्कार समारंभाकरीता रु.३.०० लक्षची तरतूद केलेली आहे. पंचायत समिती अ/मोरगांव ने पंचायत सशक्तीकरण अभियान मध्ये पहिला क्रमांक पटकाविला व पंचायत समिती गोरेगांव ने यशवंत पंचायत राज अभियानात पहिला क्रमांक मिळविला परंतू तेथील सन्मा. पदाधिकारी व सन्मा. सदस्य यांचे सत्कार समारंभ घेण्यात आलेला नाही. तर सदरचे रु. ३.०० लक्षची तरतुद करण्याचे कारण काय? यास सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी दुजोरा दिला.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी सभागृहात सादर करण्यात आलेले अंदापत्रक चांगले असले तरीही सदर अंदाजपत्रकात काही बदल होणे गरजेचे असल्याचे सांगितले. अंगणवाडी सेविकांना MS-CIT चे संगणक प्रशिक्षण देण्याचे ठरले असल्याची जाणीव करुन दिली. एकाच वर्षात सर्व सेविकांना प्रशिक्षण देणे शक्य नसल्यास टप्याटप्याने प्रशिक्षण देण्यात यावे. गोरेगांव येथील हायस्कुल ला आंतरराष्ट्रीय शाळेचा दर्जा प्राप्त आहे. यावरही तरतूद करण्यात यावी. सभागृहातील sound system दुरुस्तीकरीता तरतूद करावी. जि.प. इमारतीची रंगरगोटी मागील वर्षी करण्यात आलेली होती. त्यामूळे यावर्षी सदर निधी अंदाजत्रकातून वगळण्यात यावी.

सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी अवगत केले की, गोंदिया विश्रामगृहासाठी रु. ५.०० लक्ष देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे इतर तालुक्यातील विश्रामगृहासाठीही समप्रमाणत निधीची तरतूद करण्यात यावी. सभागृहातील sound sytem करीता मागील वर्षी रु. ३५.०० लक्ष खर्च करण्यात आले होते. परंतू आवाजात काहीही फरक पडलेला नाही. याही वर्षी रु. १.०० कोटीची तरतूद केलेली आहे. यावर नाराजी व्यक्त करुन सदर निधी दुसऱ्या विकास कामासाठी वळती करण्याचे मत व्यक्त केले. जि.प. इमारतीची किरकोळ दुरुस्ती मधील तरतुद कमी करुन दुसरीकडे वळविण्यात यावी. तसेच सन्मा. सभापती यांचे कक्षाची दुरुस्ती करण्यात आलेली असून तोही निधी इतरत्र वळती करावा. तिरोडा येथील सन्मा. सभापती यांचे कक्षाचे दुरुस्तीसाठी निधीची तरतुद करावी. तसेच जि.प. मालकीच्या जमीनी अधिग्रहण करणे यावर जास्त निधीची तरतुद करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा.

सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी तिरोडा येथिल विश्रामगृहा मधील wash room मध्ये पायही ठेऊ शकत नसल्याचे सांगितले. सदर मालमत्ता कोटीची असून विश्रामगृहामध्ये परिपूर्ण व्यवस्था असणे गरजेचे आहे. खाणसामा, सफाई कामगार इ. बाबीवर तरतूद करणे आवश्यक आहे.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा मोजमाप करणे यावर अधिक तरतुद करणे आवश्यक आहे. यामूळे जि.प.चे उत्पन्न वाढू शकते. मागील वर्षीच्या अंदाजपत्रकात रु. २.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली होती. परंतू काहीही खर्च झालेला नाही. सेवा निवृत्त भूमापन अधिकारी यांची मानधनावर नियुक्ती अजुनही झालेली नाही. सदर विषय गांभीर्याने घेत नसल्यामूळे नाराजी व्यक्त केली.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी sound system वर रु. १.०० कोटी खर्च करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. सदर खर्च कृषीवर करण्यात यावा. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी यास सहमती दर्शवित sound system वरील खर्च इतरत्र वळती करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी sound system वरील निधी पाणी टंचाईवर खर्च करण्याकरीता व सर्व जि.प. सदस्यांना किमान एक इंधन विहीर देण्याची तरतूद करण्याचे सुचविले.

सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी अवगत केले की, जि.प. सदस्य प्रतिक्षा कक्ष यावर सन २०१४-१५ मध्ये रु. १.०० लक्ष व सन २०१८-१९ करीता रु. ३.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर खर्च कुठे करण्यात करण्यात आलेला आहे व कुठे करणार आहेत. सदर प्रतिक्षा कक्ष कुठे आहे याबाबत विचारणा केली. सन्मा. सदस्यांचा प्रतिक्षा कक्षच नसतांना रु. ३.०० लक्ष कुठे खर्च करणार आहे याबाबत शंका व्यक्त केली.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी पाणीटंचाईवर जास्त तरतूद करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्रीमती रचना गहाणे यांनी अवगत केले की, जि.प. इमारतीचे दुरुस्तीकरीता रु. ५०.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ मध्ये रु. २५.०० लक्षची तरतूद केली असल्यामूळे सन २०१८-१९ मध्येही रु. २५.०० लक्षचीच तरतूद करुन उर्वरीत निधी पाणी पुरवठा विभागाकडे वळती करण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री कैलास पटले यांनी पाणी पुरवठा विभागावर जास्त खर्च करणे आवश्यक असल्याचे सांगितले. काही ठिकाणी गरज नसतांना अधिक निधी दिलेला आहे. सदर निधी इतरत्र वळती करण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी रोजगार हमी योजनेचे प्रलंबीत देयकाचे भुगतान करण्याकरीता रु. २२.०० लक्षची तरतुद केलेली आहे. सदर खर्च कोणत्या बाबीवर खर्च करणार याबाबत स्पष्टता नसून सदर निधी पाणी पुरवठा विभागावर वळती करण्याचे सुचविले. यावर मु.ले.वि.अ. यांनी जुन्या कामांचे प्रलंबित देयके भुगतान करण्याकरीता जि.प. सदस्याकडून मागणी करण्यात आलेली असल्यामूळे तरतूद करण्यात आलेली आहे. यावर सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे यांनी सदर विषय सभेत कधीही चर्चेस आलेला नाही व सदर विषय महत्वाचा नसल्यामुळे सदर निधी पाणीपुरवठा विभागाकडे वळती करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे, श्री रमेश चुऱ्हे व श्रीमती रचना गहाणे यांनीही सदर रोजगार हमी योजनेचे देयके देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची नसून ती शासनाची असल्यामूळे सदर निधी इतरत्र वळती करण्याची मागणी केली. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी रोजगार हमी योजनेचा निधी देण्याची जवाबदारी

शासनाची असल्यामूळे प्रलंबीत देयकाची निधी शासनाकडे मागणी करावी व सदर निधी इतर विभागाकडे वळती करण्याचे निर्देश दिले.

सन्मा.सदस्या श्रीमती ऊषा मेंढे यांनी जि.प. पुणे येथील सभागृहासारखे आपलेही सभागृह बनवण्याकरीता निधीची तरतूद करण्याचे मत व्यक्त केले. यावर सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे, श्री तरोणे व श्री गंगाधर परशुरामकर यांनी विरोध दर्शविला. गोंदिया जि.प.चे उत्पन कमी असल्यामूळे इतर जि.प. सोबत तुलना करणे योग्य होणार नाही. त्यापेक्षा उपयुक्त बाबींवर खर्च करावा. उदा. शाळेवर छत टाकणे, आरोग्य केंद्रात विजपुरवठा करणे, पाणीटंचाई इ. असे सुचविले.

सन्मा.सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी गोंदिया जिल्हयात जि.प.चे विश्रामगृह नसल्यामूळे गोंदिया जिल्हयाचे विश्रामगृह करीता फर्नीचर खरेदी वरील निधी इतरत्र वळती करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे व सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी सहमती दर्शविली.

स्व.वसंतराव नाईक हे हरितक्रांतीचे प्रणेते आहेत. त्यांचे स्मरणार्थ जि.प.आवारात त्यांचा पुतळा उभारण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याचे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सुचविले. यास सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे व सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी समर्थन केले.

सन्मा. उपाध्यक्ष यांनी माझे कक्षाचे भिंर्तीतून पाणी गळत असल्यामूळे कक्षाची दुरुस्ती करणे अति आवश्यक असल्याचे सांगितले. यास सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी सहमती दर्शविली.

सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी रस्त्याचे बांधकाम व इतर बांधकामे परिक्षण व दुरुस्ती या लेखाशिर्षात जास्त तरतुद असून ती कमी करुन सदर निधी जिल्हयातील सर्व आरोग्य केंद्रातील इलेक्ट्रीसीठी देयक व देखभाल दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी कोर्ट व वकील फी या लेखाशिर्षात प्रत्येक वर्षी तरतूद वाढत आहे, कोर्ट प्रकरणे वाढणे व यावर एवढा खर्च होणे योग्य नसल्याचे सांगितले. तसेच क्रिडा सत्र आयोजनास अर्थसहाय्य या लेखाशिर्षात रु. २०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली असून त्यातील रु. १०.०० लक्ष इतरत्र वळती करण्याचे सुचविले. यावर सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी सदर निधी तालुका स्तरावरही वितरीत केला जातो. हा ही निधी अपुरा जातो. सदर निधी कमी करण्यापेक्षा १० टक्के निधी वाढवण्याची आवश्यकता आहे. सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे यांनी जि.प. हायस्कुल व ज्यु.कॉलेज चालविण्याकरीता प्रत्येकी रु. १.०० लक्ष व रु. ३.०० लक्ष तरतुद करण्याची विनंती केली. तसेच घडयाळी तासीकेवर असलेले शिक्षक यांचे मानधन निधी जिल्हा परिषदेला ठेवण्यापेक्षा शिक्षकांचे मानधन वेळेवर व्हावे याकरीता मुख्याध्यापक यांचेकडे ठेवण्याचे सुचविले. यास सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे, सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे व सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी समर्थन दिले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी सांस्कृतीक कार्यक्रमावर खर्च करण्यापेक्षा सदर निधी सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या शिक्षण विभागावर खर्च करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी घडयाळी सेवक हे नियमीत शिक्षकाप्रमाणेच काम करतात त्यामूळे त्यांचे मानधनात वाढ होणे आवश्यक असल्याचे व वेळेवर वेतन होण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी लेखाशिर्ष १०१-३३/१ कर्करोग व दुर्धर रोगावरील उपचारासाठीची तरतूद वाढविण्याचे सुचविले. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की पीडीताला रु. १५००० ऐवजी रु. २५००० देण्यात यावे असा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यामूळे

ही तरतूद वाढविण्याची मागणी केली. तसेच आजाराचे प्रमाणे वाढत असल्यामूळे रु. ४.०० लक्ष ऐवजी रु. ५.०० लक्ष तरतूद करावी. सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी पिडीताला १ महिन्याचे आत आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी लेखाशिर्ष १०१-११ अभ्यास दौरा लेखशिर्षात रु. ४०,००० वरुन रु. ५.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद फार जास्त असून तरतूद कमी करण्यात यावी असे सुचविले. सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी महिलांचे सुरक्षेसाठी महिलांना आत्मरक्षण करणेसाठी तायकांडो प्रशिक्षण देण्याकरीता निधीची तरतूद करण्याचे सुचविले. यास सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनी समर्थन दिले.

सन्मा. सदस्य श्री किशोर तरोणे यांनी समुपदेशन केंद्र यांचे कामकाज बरोबर नसल्यामूळे सदर योजना बंद करुन इतरत्र त्याच विभागात वळती करण्याचे सुचविले. सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी समर्थन दिले. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी जिल्हा परिषदे मार्फत चालविण्यात येणारे समुपदेशन केंद्र व राज्य शासनाकडून चालविण्यात येणारे समुपदेशन केंद्र येथील कर्मचारी यांचे वेतनात फार फरक आहे. जि.प.चे समुपदेशन केंद्र बरोबर चालविले जात नाही. तसेच जि.प.चे समुपदेशन केंद्र सुरु असल्यामूळे राज्य शासनाचे समुपदेशन केंद्र सुरु होऊ शकत नाही. करीता जि.प.चे समुपदेशन केंद्र बंद करुन राज्य शासनाचे समुपदेशन केंद्र सुरु होणे आवश्यक आहे.

सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी जिल्हयात कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्यामूळे अंगणवाडी येथे आहार पुरविण्याकरीता निधीची तरतुद करण्याची मागणी केली. सन्मा. सभापती बालकल्याण यांनी सहमती दर्शवुन निधीची मागणी केली. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी कुपोषण दुर करण्याकरीता आहार पुरविण्याकरीता निधीची तरतुद करण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी अंगणवाडी येथील बालकांकरीता गणवेश खरेदीकरीता निधीची तरतुद करण्याची मागणी केली. समुपदेशन केंद्रातील निधी गणवेश पुरवठा करणे यावर वळती करण्यात यावा. सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनीही यास समर्थन दिले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन्मा. पदाधिकारी यांचे निवासस्थान तयार झाल्यामूळे घरभाडे देण्यात येऊ नये. असे पत्र काढलेले असतांना यावर तरतूद कां करण्यात आली. सदर निधी इतरत्र वळविण्यात यावी. यास सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी समर्थन दिले. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांनी माहिती दिली की, काही सन्मा. पदाधिकारी यांचे मागील घरभाडे देणे शिल्लक असल्यामूळे तरतूद करण्यात आलेली आहे.

सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी महिलांचे आरोग्य तपासणीसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्याकरीता निधीची तरतूद करण्याची मागणी केली. यास सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी समर्थन दिले व लेखाशिर्ष १०१-५०/१ व १०१-५०/३ मधील तरतुद इतरत्र वळती करण्याचे मत व्यक्त केले.

दलीतवस्ती करीता काहीही तरतूद केली नसल्याचे सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनी निदर्शनास आणून दिले. समाज मंदीर दुरुस्तीकरीता शासनाकडून निधी प्राप्त होत नाही. अनेक समाज मंदीरांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामूळे सदर लेखाशिर्षात तरतूद करण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी अवगत केले की, वाचनालयासाठी पुस्तक संच पुरविणे यास चांगला प्रतिसाद मिळत असल्यामूळे १०१-२१/२ वाचनालयासाठी पुस्तक संच पुरविणे या लेखाशिर्षात रु. ५.०० लक्षची तरतूद करण्याची मागणी केली. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी तरतुद वाढविण्याचे निर्देश दिले.

१०१-३३/१० अंतर्गत शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्रीचे वाटप करणे या लेखाशिर्षाअंतर्गत केलेली तरतुद कमी करुन १०१-३३/११ या लेखाशिर्षा अंतर्गत ५० टक्के अनुदानावर धान बियांणाचे वाटप करणे यात रु. १५.०० लक्षची तरतूद केलेली आहे, ती वाढवुन रु. २५.०० लक्ष करण्याची मागणी सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे, सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर व सन्मा. सदस्य श्री कुंदन कटारे यांनी केली.

आपातकालीन अर्थसहाय्य करीता १०१-३३/२ लेखाशिर्षात आपातकालीन अर्थसहाय्यकरीता कृषीच्या अनेक योजना आहेत. त्यामूळे तरतूद करण्याची आवश्यकता नसल्याचे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी मत व्यक्त केले. यावर सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी अवगत केले की, मुख्यमंत्री सहाय्यता निधीप्रमाणेच जिल्हयातही इतर योजनेचा लाभ न मिळाल्यास त्याकरीता तरतूद करण्यात आलेली आहे.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, नविन वाहन खरेदी करीत असल्यामूळे वाहन दुरुस्तीचा खर्च येणार नाही. त्यामूळे १०१-५१/१ अंतर्गत वाहन दुरुस्तीवरील खर्चाची तरतूद अर्धी करण्याचे मत व्यक्त केले. यास सन्मा. सदस्य श्री रमेश चुऱ्हे यांनी समर्थन दिले.

१०१-१७ अंतर्गत आधुनिकीकरण व नुतनीकरण व १०१-१८ क्रिडा महोत्सव व सांस्कृतीक कार्यक्रम अंतर्गत तरतूद कमी करण्याचे सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी मत व्यक्त केले.

१०१-५३ अंतर्गत दुकानगाळे बांधकामा अंतर्गत तिरोडा येथे मोक्याच्या ठिकाणी दुकानगाळे बांधकाम करण्याकरीता निधीची मागणी मागील ३ सभेपासून करण्यात येत आहे. परंतू निधी मंजूर करण्यात आलेली नाही. सदर ठिकाणी दुकानगाळे बांधकाम केल्यास जि.प. चे उत्पन्न वाढेल. करीता दुकानगाळे बांधकामाकरीता निधीची तरतूद करण्याची मागणी सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी केली. यास सन्मा. सदस्य श्री मनोज डोंगरे यांनी समर्थन देऊन दुकानगाळे बांधकामाकरीता निधीची मागणी केली.

पंचायत समिती स/अर्जुनी, अ/मोरगांव व देवरी येथील बाजाराची जागा लिलाव न होण्याचे कारण सभागृहात विचारण्यात आले. तसेच जि.प. च्या मालकीचे बाजार नगर पंचायत लिलाव करीत असल्यामूळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होत आहे. सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी देवरी येथील बाजाराची जागा नगर परिषदेने लिलाव केल्याचे निदर्शनास आणून दिले. सदर बाजाराचा लिलाव मागील वर्षी रु. १०.०० लक्षात व या वर्षी रु. १८.३५ लक्षात लिलाव झालेला आहे. त्यामूळे मोठया प्रमाणात जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करीता मोजमाप करणारे अधिकारी यांची मानधनावर त्वरीत नियुक्ती करुन देवरी तालुक्यापासून जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा मोजमाप सुरु करावी अशी मागणी केली. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी १०१-२१ व १११-२१ यामध्ये कोणती तफावत आहे याबाबत विचारणा केली व समाधानकारक उत्तर न मिळाल्यास सदर विषयाला मंजूरी देण्यात येऊ नये असे मत व्यक्त केले.

कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे व कार्यकारी अभियंता, ग्रापापु सभेत उपस्थित नसल्यामूळे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी नाराजी व्यक्त केली. दरवर्षी बोरवेलची संख्या वाढत असल्यामूळे त्यावरील निधीची तरतूदही वाढणे अपेक्षीत आहे. परंतू अंदाजपत्रकात तरतूद कमी करण्यात आलेली आहे. हातपंपाकरीता पाईपच्या मागणीवरुन सभागृहात ओरड सुरु असते. तरीही तरतुद कमी करण्यात आलेली आहे.

जिल्हयात पाणी टंचाई असल्यामूळे ११३-२१ (पिण्याच्या पाण्याची तातडीची उपाययोजना) मध्ये तरतुद वाढविल्यामूळे पाणी टंचाईचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होऊ शकते. त्यामूळे सदर लेखाशिर्षात रु. १०.०० लक्षची तरतुद करण्याची मागणी केली. १०६-२१ या लेखाशिर्षातील तरतुद तातडीची उपाययोजना या लेखाशिर्षात वळती करण्याची मागणी सन्मा. सदस्य श्री कुंदन कटारे यांनी केली.

१०१-२७/१ (उपविभाग दुरुस्ती) वरील खर्च १०१-२७/३ (पानघाट निर्मीती करणे) या लेखाशिर्षावर वळती करण्याची मागणी सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी केली.

वरिलप्रमाणे जि.प. गोंदियाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करुन सुधारणेसह ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव सुधारणेसह सर्वानूमते मंजूर.**

स्वा/-
सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया.

स्वा/-
अध्यक्ष,
जिल्हा परिषद, गोंदिया

## <u>जिल्हा परिषद विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०३.२०१८</u>

## <u>कार्यवृत्त भाग - २</u>

| दिनांक व वेळ | उपस्थित पदधिकाऱ्यांची नांवे | उपस्थित अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक १६.०३.२०१८<br>वेळ दुपारी ११.०० वाजता | हजेरी पटाप्रमाणे | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**<u>विषय क्र. १</u>:- जि.प. गोंदियाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकाला मंजूरी प्रदान करणे.**

**<u>ठराव क्र. १</u> :-** सविस्तर चर्चे अंती आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेने सुधारणेसह जिल्हा परिषद गोंदियाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकास सर्वानूमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सुधारणेसह सर्वानूमते मंजूर.**

स्वा/-
सचिव
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
जिल्हा परिषद, गोंदिया.

स्वा/-
अध्यक्ष,
जिल्हा परिषद, गोंदिया